सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण विभाग

राज्य विज्ञान शिक्षण संस्था

(प्रादेशिक विद्या प्राधिकरण)

नागपूर

वार्षिक अहवाल

२०२५-२६

विज्ञानाची प्रेरणा... नवोपक्रमाची दिशा...
उज्ज्वल भविष्यासी निर्मिती...





वैज्ञानिक दृष्टिकोन

नवोपक्रम व संशोधन

विद्यार्थी सक्षमीकरण

गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षण

विज्ञान प्रसार व जनजागृती

राज्य विज्ञान शिक्षण संस्था
(प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर
२९, सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४०००१

०७१२-२५३२०६५

directorsise@gmail.com



राज्य विज्ञान शिक्षण संस्था

(प्रादेशिक विद्या प्राधिकरण)

रवीनगर, नागपूर -४४०००१

E-mail: directorsise@gmail.com

raanagpur@maa.ac.in

वार्षिक अहवाल

२०२५-२६

ऋणनिर्देश



मा.देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य



मा.एकनाथजी शिंदे
उपमुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य



मा.सुनेत्राताई पवार
उपमुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

प्रेरणा



मा.ना.दादाजी भुसे
मा. मंत्री
शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य



मा.ना.डॉ.पंकजजी भोयर
मा. राज्यमंत्री
शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य

मार्गदर्शक



मा.रनजित सिंह देओल (भाप्रसे)
प्रधान सचिव,
शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य



मा. सचिंद्र प्रताप सिंह (भाप्रसे)
आयुक्त, शिक्षण
महाराष्ट्र राज्य



मा. डॉ. हेमंत वसेकर (भाप्रसे)
संचालक ,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,
पुणे

अनुक्रमणिका

संचालकांचे मनोगत 1
संस्थेची पार्श्वभूमी 3
INSPIRE-MANAK Award योजना 12
राज्यस्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२५-२६ 19
राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२५-२६ 24
५३ वी राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६ 30
बालवैज्ञानिकांसाठी शासनाच्या नाविन्यपूर्ण प्रेरणादायी योजना 40
डेटा विश्लेषण क्षमता विकास कार्यक्रम 47
पश्चिम भारत विज्ञान जत्रा 54

संचालकांचे मनोगत

विज्ञान म्हणजे केवळ ज्ञान नव्हे, तर भविष्य घडविण्याची शक्ती आहे;
संशोधन म्हणजे केवळ शोध नव्हे, तर विकासाची दिशा आहे;
नवोपक्रम म्हणजे केवळ कल्पना नव्हे, तर परिवर्तनाचा मार्ग आहे;
आणि विद्यार्थी म्हणजे या परिवर्तनाचे खरे शिल्पकार आहेत.



विज्ञान हे केवळ ज्ञानाचे साधन नसून समाजपरिवर्तन, राष्ट्रविकास आणि मानवी प्रगतीचा मूलाधार आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), क्वांटम तंत्रज्ञान, रोबोटिक्स, अवकाश संशोधन, जैवतंत्रज्ञान आणि हरित ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये होत असलेल्या झपाट्याने प्रगतीमुळे संपूर्ण जग नव्या युगात प्रवेश करत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचारशक्ती, नवसर्जनशीलता, संशोधनवृत्ती आणि समस्या निराकरण कौशल्य विकसित करणे ही शिक्षण व्यवस्थेची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी बनली आहे. या व्यापक उद्दिष्टपूर्तीसाठी राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर (प्रादेशिक विद्या प्राधिकरण) सातत्याने विविध वैज्ञानिक, शैक्षणिक आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे.

महाराष्ट्र शासनाचे मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, तसेच मा. शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे आणि मा. राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली राज्यात विज्ञान शिक्षणाला नवी दिशा प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी, संशोधन आणि नवोपक्रमाला चालना मिळावी तसेच ग्रामीण, आदिवासी आणि दिव्यांग विद्यार्थ्यांनाही जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने शासनाने घेतलेले अनेक निर्णय ऐतिहासिक स्वरूपाचे आहेत. विशेषतः "**मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी**" या अभिनव उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञान केंद्रे, इस्रो (ISRO) आणि नासा (NASA) यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांना भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील पारितोषिकांच्या रकमेत करण्यात आलेली भरीव वाढ ही विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक क्षमतेचा आणि परिश्रमाचा सन्मान करणारी बाब आहे.

सन २०२५-२६ हे शैक्षणिक वर्ष संस्थेसाठी अत्यंत प्रेरणादायी, यशस्वी आणि उपक्रमशील ठरले. या कालावधीत राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध विज्ञानविषयक उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी, INSPIRE-MANAK Award योजना, अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा, राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव, ग्रामीण विज्ञान छंद मंडळे, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, विज्ञान प्रसार उपक्रम आणि विज्ञान प्रदर्शनांच्या विविध टप्प्यांमधून हजारो विद्यार्थ्यांना विज्ञानाशी प्रत्यक्ष जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे INSPIRE-MANAK Award योजनेंतर्गत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या अभिनव कल्पना सादर केल्या. ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांनी स्थानिक समस्यांवर विज्ञानाधारित उपाय सुचवून संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. विद्यार्थ्यांमधील ही वैज्ञानिक जिज्ञासा आणि नाविन्यपूर्ण विचारसरणी भविष्यात भारताला संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रात जागतिक नेतृत्वाच्या दिशेने घेऊन जाणारी ठरेल, असा दृढ विश्वास वाटतो.

राज्यस्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यात "**क्वांटम युगाची सुरुवात : संभाव्यता व आव्हाने**" या अत्यंत समकालीन विषयावर विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण करून विज्ञानातील गुंतागुंतीच्या

संकल्पना सुलभ व आकर्षक पद्धतीने मांडल्या. त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीमधून, आत्मविश्वासातून आणि संशोधनाभिमुख दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील विद्यार्थी जागतिक विज्ञान प्रवाहाशी सक्षमपणे जोडले जात असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव हा विद्यार्थ्यांच्या कलात्मक अभिव्यक्तीला वैज्ञानिक जाणिवांची जोड देणारा अत्यंत प्रभावी उपक्रम ठरला. विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि मानवी मूल्ये यांचा सुंदर संगम विद्यार्थ्यांनी नाटकांच्या माध्यमातून सादर केला. विज्ञानाचा प्रसार केवळ प्रयोगशाळांपुरता मर्यादित न राहता समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, हा या उपक्रमामागील उद्देश असून तो यशस्वीपणे साध्य होत असल्याचे समाधान वाटते.

विज्ञान आणि गणित शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, प्रयोगशील आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी संस्थेमार्फत शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने त्यांचे विषयज्ञान, अध्यापन कौशल्य, प्रयोगशीलता आणि तंत्रज्ञानाधारित अध्यापन क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

या सर्व उपक्रमांच्या यशामागे विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, विज्ञान पर्यवेक्षक, शिक्षक, तज्ज्ञ मार्गदर्शक, विविध शासकीय व स्वयंसेवी संस्था, पालक आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या सहकार्यामुळे विज्ञान प्रसाराची चळवळ राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचविणे शक्य झाले आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), क्वांटम तंत्रज्ञान, रोबोटिक्स, अवकाश विज्ञान, हरित तंत्रज्ञान, संशोधन आणि नवोपक्रम आधारित शिक्षण या क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न राहील. विज्ञाननिष्ठ, संशोधनप्रधान, नवोन्मेषी आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्य विज्ञान शिक्षण संस्था कटिबद्ध आहे.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण करून त्यांना संशोधन, नवोपक्रम आणि राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने प्रेरित करणे हेच आमचे ध्येय आहे. आजच्या बालवैज्ञानिकांच्या हातातील कल्पना उद्याच्या विकसित भारताचे भविष्य घडवतील, याविषयी मला पूर्ण विश्वास आहे.

डॉ. राजकुमार अवसरे
संचालक
राज्य विज्ञान शिक्षण संस्था
(प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर

राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर : पार्श्वभूमी

राज्य विज्ञान शिक्षण संस्था, या संस्थेची केंद्र शासनाच्या शालेय विज्ञान शिक्षण सुधार कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाने सन १९६८ मध्ये पुणे येथे स्थापन केली. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या संस्थेशी संलग्न असलेल्या कार्यालयाच्या विकेंद्रीकरणामुळे १ एप्रिल १९८० पासून राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे **नागपूर** येथे स्थलांतर करण्यात आले. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत विद्या प्राधिकरणाची पुनर्रचना (पूर्वीचे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे) दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आली. या शासन निर्णयान्वये विभागस्तरावर ५ प्रादेशिक विद्या प्राधिकरणे (नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, मुंबई) तयार करण्यात आली असून पुनर्रचनेनुसार राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे नाव **'प्रादेशिक विद्या प्राधिकरण' नागपूर** असे करण्यात आले.

संस्थेचे प्रमुख हेतू :-

- विज्ञान शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक वृत्तीचा परिपोष करणे.
- विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे.
- विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विद्यार्थी, शिक्षक व जनसामान्यांमध्ये प्रसार करणे.
- प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत विज्ञान व गणित अध्ययन-अध्यापनाचे संसाधन निर्माण करून प्रशिक्षणे आयोजित करणे.
- राष्ट्रीय व राज्यस्तरावरील विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाशी संबंधित उपक्रम व स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा विकास होण्यासाठी प्रेरणा देणे.

संस्थेचा इतर शासकीय प्राधिकरणे व संस्था यांचेशी समन्वय व संबंध :-

- विज्ञान व तंत्रज्ञान विभाग (DST) भारत सरकार, नवी दिल्ली.
- राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली.
- राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद (NCSM), कोलकाता.
- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे
- डॉ. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई.

- नेहरू विज्ञान केंद्र, वरळी, मुंबई.
- रामन विज्ञान केंद्र, वरळी, मुंबई.
- रामन विज्ञान केंद्र व तारांगण मंडळ, नागपूर.
- IISER, Pune.
- यशदा, पुणे.

संस्थेद्वारे कार्यान्वित विविध उपक्रम :-

1. राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी .
2. पश्चिम भारत विज्ञान जत्रा.
3. अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा.
4. राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव.
5. विज्ञान मंच योजना.
6. ग्रामीण विज्ञान छंद मंडळे.
7. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा-विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबीर.
8. INSPIRE-MANAK Award योजना.
9. अगस्त्या फाउंडेशन, कुप्पम, बंगळुरू यांचेशी झालेल्या करारा अंतर्गत माध्यमिक शाळेतील गणित व विज्ञान शिक्षकांचे प्रशिक्षण.
10. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे गणित व विज्ञान विषयाचे प्रशिक्षण.
11. NCERT, नवी दिल्ली व RIE, भोपाळ द्वारा आयोजित विविध विषयाचे प्रशिक्षण.

विविध उपक्रमाच्या कार्यान्वयनासाठी सहकार्य :-

- मा. विभागीय शिक्षण उपसंचालक.
- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प..
- मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना/शिक्षण निरिक्षक).
- मा. शिक्षणाधिकारी (मनपा).

संस्थेचे प्रतिनिधी-

- **विभागस्तरावर – शास्त्र सल्लागार**
- **जिल्हास्तरावर - विज्ञान पर्यवेक्षक.**

संस्थेद्वारा राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा तपशील :

➢ राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी :

१) NCERT नवी दिल्ली यांचे दिशानिर्देशाप्रमाणे सन १९७१ पासून शालेयस्तर ते राष्ट्रीय पातळीपर्यंत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. महाराष्ट्रात सन १९७४-७५ पासून तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे.

२) राष्ट्रीय निकड व सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेवून NCERT, नवी दिल्ली यांचे कडून दरवर्षी विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय व उपविषय निश्चित करण्यात येतात.

३) विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता (Creativity) वाढीस लागून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होते. तसेच मार्गदर्शक शिक्षकांच्या सहकार्याने त्यांनी तयार केलेले वैज्ञानिक प्रतिकृती सादर करण्यास अधिकृत व्यासपीठ मिळते. विज्ञान प्रदर्शनात सर्व मान्यता प्राप्त शाळेतील विद्यार्थी प्राथमिक गट (इयत्ता ८ वी पर्यंत) व माध्यमिक गट (इयत्ता ९ वी ते १२ वी) या दोन गटातून सहभाग घेतात. या दोन गटामध्ये आदिवासी जिल्ह्यांना आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष संधी दिली जाते. त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक / परिचर त्यांच्या शैक्षणिक साधनांच्या सादरीकरणासाठी सहभागी होतात.

४) राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातून (प्राथमिक गट व माध्यमिक गट) गुणानुक्रमे निवड झालेल्या **१४ विज्ञान प्रतिकृतींची राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनातील सहभागासाठी शिफारस करण्यात येते.** साधारणतः NCERT नवी दिल्ली यांचे मार्फत यामधून ६ ते १० वैज्ञानिक प्रतिकृतीची राष्ट्रीय प्रदर्शनातील सहभागातील निवड केली जाते.

➢ पश्चिम भारत विज्ञान जत्रा :-

नेहरू विज्ञान केंद्र, वरळी, मुंबई येथील सहभागासाठी राज्यस्तरावरील विज्ञान प्रदर्शनातून गुणानुक्रमे निवड प्राप्त प्राथमिक स्तर व माध्यमिक स्तर यामधून प्रत्येकी तीन वैज्ञानिक प्रतिकृती आणि माध्यमिक शिक्षक गटातून तीन शैक्षणिक साधने याप्रमाणे ९ प्रदर्शनीय प्रतिकृती पश्चिम भारत विज्ञान जत्रेमध्ये सहभागी होतात.

➢ ग्रामीण विज्ञान छंद मंडळे व विज्ञान अध्यापक मंडळ:-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांमध्ये क्षेत्रीय अधिकारी व विज्ञान-गणित शिक्षक संघटनेच्या मदतीने विज्ञान छंद मंडळे स्थापन व्हावीत यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येते. याअंतर्गत विज्ञान विषयक विविध उपक्रम घेण्यात येते.

➢ शिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रम :

अगस्त्या फाउंडेशन, कुप्पम, बंगळुरू यांचेशी झालेल्या करारा अंतर्गत माध्यमिक शाळेतील गणित व विज्ञान शिक्षकांचे प्रशिक्षण शालेय स्तरावर गणित व विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता वाढावी, शिक्षकांचे विषयज्ञान व कौशल्य समृद्ध व्हावीत या करिता राज्यातील सर्व माध्यमिक शाळांतील गणित व विज्ञान शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते.

➢ उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे गणित व विज्ञान विषयाचे प्रशिक्षण :-

उच्च प्राथमिक शाळेतील गणित व विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता वाढावी हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे. राज्यातील सर्व जि. प. मनपा, नप आणि खाजगी अनुदानित उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांना गणित आणि विज्ञान विषयाचे सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात येते. याप्रमाणे प्रशिक्षणासंबंधी आयोजन, व्यवस्थापन, संनियंत्रण व अनुधावन यासंबंधीची कार्यवाही या संस्थेमार्फत केली जाते.

➢ राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव :-

१) सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद(NCSM), कोलकाता यांचे मार्फत दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सवाचे आयोजन केले जाते.

२) विद्यार्थी, शिक्षक आणि जनसामान्यत मनोरंजन पद्धतीने वैज्ञानिक साक्षरतेचा प्रसार करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि शालेय विद्यार्थ्यांच्या अभिनय क्षमतांना वाव देणे या हेतूने विज्ञान नाट्योत्सवाचे आयोजन केले जाते.

३) (NCSM) कोलकाता द्वारा राष्ट्राची निकड लक्षात घेऊन विज्ञान नाट्योत्सवाकरिता मुख्य विषय व उपविषय निश्चित केले जातात. तालुका, जिल्हा, विभाग व राज्यपातळीवर या उपक्रमांतर्गत विज्ञान नाट्य स्पर्धाचे आयोजन केले जाते.

४) या विज्ञान नाट्य स्पर्धेत प्रत्येक शाळेतील इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतच्या कमाल ८ विद्यार्थ्यांची एक चमू विहित विषय/उपविषयावर आधारित ३० मिनिटांचे विज्ञान नाट्य सादर करते.

५) (NCSM) अंतर्गत नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई हे झोनल स्तरीय (पश्चिम भारत) विज्ञान नाट्यस्पर्धेचे आयोजन करते. या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गोवा, दिव व दमन या सहा राज्ये व केंद्रशासित प्रदेशामधील सर्वोत्कृष्ट प्रत्येकी दोन विज्ञान नाट्य सहभागी होतात.

६) झोनल स्तरावरून सर्वोत्कृष्ठ दोन विज्ञान नाट्य राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्वात सहभागी होतात.

७) राष्ट्रीय पातळीवर सर्वोत्कृष्ट ठरलेल्या विज्ञान नाट्यांना प्रमाणपत्रासह पुरस्कारित केले जाते.

➢ विज्ञान मंच योजना :-

(सदर योजना NCERT स्तरावरून तात्पुरती स्थगित केल्यामुळे सद्यस्थितीत बंद आहे.)

१) शालेय विद्यार्थ्यांमध्ये प्रयोगशीलता व स्पर्धात्मक वृत्तींचा विकास व्हावा यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील विज्ञान महाविद्यालयात एक विज्ञान मंच केंद्र कार्यरत आहे.

२) इयत्ता ८ वी उत्तीर्ण होऊन इयत्ता ९ वी मध्ये नियमित शिकत असलेले विद्यार्थी विज्ञान मंच निवड चाचणी साठी पात्र ठरतात.

३) प्रत्येक जिल्हा विज्ञान मंच केंद्रासाठी शहरी भागातील ('अ' गट) ३० आणि ग्रामीण भागातील ('ब' गट) ४० याप्रमाणे जिल्ह्यातून ७० शालेय विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते.

४) दिवाळी किंवा दीर्घ मुदतीच्या सुट्यांमध्ये सात दिवसीय शैक्षणिक शिबीराचे आयोजन करण्यात येते.

५) राज्यात ३४ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक आणि मुंबई शहरात तीन याप्रमाणे एकूण ३७ विज्ञान मंच केंद्र कार्यरत आहेत.

६) वैज्ञानिक व्याख्याने, प्रयोग, कृती, प्रश्नमंजुषा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वैज्ञानिक सहली इत्यादींचे विज्ञान मंच शिबीरात आयोजन करण्यात येते.

➢ राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबीर :-

(सदर योजना NCERT स्तरा वरून तात्पुरती स्थगित केल्यामुळे सध्यस्थितीत बंद आहे)

१) NCERT, नवी दिल्ली यांचे मार्फत सन १९६३ पासून NTSE शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केली जाते.

२) शालेयस्तरावरील इयत्ता १० वी अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेवून त्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य द्यावे आणि पुढे या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी राष्ट्राच्या विकासासाठी योगदान द्यावे, या हेतूने ही शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित आहे.

३) या योजनेअंतर्गत NCERT, नवी दिल्ली दरवर्षी १,००० शिष्यवृत्त्या प्रदान करीत असते. यापैकी १५० शिष्यवृत्त्या अनुसुचित जातीसाठी आणि ७५ शिष्यवृत्त्या अनुसूचित जमातीसाठी राखीव असतात.

४) महाराष्ट्र राज्यातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त NTSE शिष्यवृत्त्या प्राप्त व्हाव्यात या हेतूने राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येते. विशेषतः ग्रामीण भागातील प्रज्ञावंत, गरजू आणि मागासवर्गीय विद्यार्थी यांना राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेत हे यश प्राप्त व्हावे यासाठी १२० विद्यार्थ्यांचे दहा दिवसीय राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबीराचे दरवर्षी एप्रिल महिन्याचे अखेर आयोजन करण्यात येते.

५) राज्यस्तरीय मार्गदर्शन शिबीर निवासी स्वरूपाचे असून यासाठी कोणतीही फी निवड प्राप्त विद्यार्थ्यांकडून आकारली जात नाही.

६) या शिबीरात राज्य पातळीवरील २० तज्ज्ञ प्राध्यापक (NTSE Stage 2) या अंतिम परीक्षेतील यशासाठी आवश्यक मार्गदर्शन करतात.

➢ अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा :-

१) राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद (NCSM) कोलकाता अंतर्गत नेहरू विज्ञान केंद्र मुंबई यांचे दिशानिर्देशाप्रमाणे तालुका, जिल्हा, विभाग, राज्यपातळीवर विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

२) विद्यार्थ्यांना विचार प्रवृत्त करणे, त्यांच्यात कार्यकारणभाव रूजविणे आणि त्यांना वैज्ञानिक विचारांचे आदान-प्रदान करण्यासाठी अधिकृत व्यासपीठ उपलब्ध करून देणे या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. शासनमान्य शाळेतील इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी या उपक्रमात सहभाग घेवू शकतात.

३) दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद कोलकाता यांचेकडून अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याकरिता विषय देण्यात येतो.

४) सहभागी विद्यार्थी विषयावर आधारित पूरक शैक्षणिक साहित्यांच्या आधारे ६ मिनिटांचे अभ्यासपूर्ण भाषण देतात.

५) राज्यस्तरीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यातून विहित मूल्यांकनाच्या निकषाप्रमाणे एका विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड केली जाते.

६) राष्ट्रीय पातळीवरील अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यातून गुणानुक्रमे दहा विजेत्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडून पुरस्काराच्या स्वरूपात शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

➢ INSPIRE Award योजना :-

१) Innovation in Science Pursuit For Inspired Research (INSPIRE) हा विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार यांचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे.

२) कार्यक्रमाचा मुख्य हेतू शालेय स्तरापासूनच प्रतिभावान विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाच्या अभ्यासाकडे आकर्षित करणे आणि त्यांना विज्ञानाच्या मूलभूत शाखेतील उच्च शिक्षणासाठी तसेच संशोधन कार्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देणे.

३) अठराव्या पंचवार्षिक योजनेत हा कार्यक्रम सुरु झाला असून बाराव्या पंचवार्षिक योजनेत (सन २०१२- २०१७) सुरु आहे.

४) INSPIRE या कार्यक्रमांतर्गत INSPIRE Award ही योजना शालेय विद्यार्थ्यांसाठी (इ. ६ ते १२) कार्यान्वित आहे.

५) महाराष्ट्र राज्याकरीता राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर, म्हणून State Nodal Agency कार्य करीत आहे. जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक हे या योजनेकरीता जिल्हा समन्वयक अधिकारी आहेत.

६) या योजनेत इयत्ता ६ ते १२ वर्ग असलेल्या सर्व व्यवस्थापनाच्या मान्यताप्राप्त शाळांनी सहभाग घेणे अपेक्षित आहे. inspireaward-dst.gov.in या वेबसाईटवर Registration करून संबंधित शाळांना विद्यार्थ्यांचे नामांकने विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार यांना Online सादर करावे लागतात. DST भारत सरकार हे प्राप्त प्रस्तावानुसार विद्यार्थ्यांची INSPIRE Award करीता निवड करते.

७) अवार्डी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पांचे प्रथम जिल्हास्तरावर सादरीकरण केले जाते. जिल्हा स्तरावरून राज्य स्तराकरीता निकषानुसार उत्कृष्ट प्रकल्पाची निवड केली जाते. राज्यस्तरीय प्रदर्शनात सहभागी झालेल्या प्रकल्पांमधून निकषानुसार उत्कृष्ट प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धेकरीता निवड केली जाते.

८) SAKURA Exchange Programme of Japan कार्यक्रमांतर्गत इन्स्पायर अवार्ड राष्ट्रीय प्रदर्शनातील पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना जपान देशाचा प्रवास करण्याची संधी DST कडून देण्यात येते.

९) सन २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र राज्याने ३७००० हजार ideas ची नोंदणी केली होती त्यापैकी २३०३ ideas ची निवड पुढील प्रक्रीयेकरिता झालेली आहे.

मागील ४ वर्षात पार पडलेल्या प्रदर्शनी /नाट्योत्सव / विज्ञान मेळावा तपशील

उपक्रमाचे नाव	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५	२०२५-२६
1. राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी	ONLINE	सावंतवाडी	अमरावती	नागपूर
2. इन्स्पायर अवार्ड प्रदर्शनी	कराड, सातारा	शहापूर, भंडारा	शहापूर, भंडारा	NA
3. विज्ञान नाट्योत्सव	वर्धा	सावंतवाडी	शहापूर, भंडारा	अमरावती
4. विज्ञान मेळावा	NA	जयगड, रत्नागिरी	अमरावती	नागपूर

राज्य विज्ञान शिक्षण संस्था (प्रादेशिक विद्या प्राधिकरण) रविनगर, नागपूर या संस्थेस मंजुर पदांचा आकृतीबंध आणि सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पदनाम	पदाचा संवर्ग	मंजुर पदसंख्या
1	**संचालक**	वर्ग-1	01
2	**वरिष्ठ अधिव्याख्याता**	वर्ग-1	04
3	**अधिव्याख्याता**	वर्ग-2	11
4	**अधिक्षक**	वर्ग-2	01
5	**विषय सहाय्यक**	वर्ग-3	08

6	**ग्रंथपाल**	वर्ग-3	01
7	**लघुलेखक**	वर्ग-3	02
8	**मुख्य लिपिक**	वर्ग-3	01
9	**वरिष्ठ लिपिक**	वर्ग-3	02
10	**कनिष्ठ लिपिक**	वर्ग-3	02
11	**कनिष्ठ लिपिक (व्यवसाय मार्गदर्शन)**	वर्ग-3	02
12	**प्रयोगशाळा सहाय्यक**	वर्ग-3	03
13	**वाहन चालक**	वर्ग-3	01
14	**नाईक**	वर्ग-4	01
15	**शिपाई**	वर्ग-4	05
16	**सफाईवाला**	वर्ग-4	01
	एकुण		46

राज्य विज्ञान शिक्षण संस्थे द्वारा सन २०२५-२६ मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल

योजनेचे नाव : INSPIRE- MANAK Award योजना :-

INSPIRE- Innovation in Science Pursuit For Inspired Research (INSPIRE) हा भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (DST) सुरू केलेला महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. **MANAK- Million Minds Augmenting National Aspirations and Knowledge** ही योजना **DST** व **National Innovation Foundation (NIF)** यांच्या सहकार्याने अधिक सक्षम व शिस्तबद्ध स्वरूपात राबवली जाते. या कार्यक्रमाचा मुख्य हेतू शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे, नैसर्गिक जिज्ञासा वाढवणे आणि नवीन वैज्ञानिक नवकल्पनांना प्रेरणा देणे आणि त्यांना विज्ञानाच्या मूलभूत शाखेतील उच्च शिक्षणासाठी तसेच संशोधन कार्यासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. **INSPIRE- MANAK** या कार्यक्रमांतर्गत **INSPIRE- Award** ही योजना 2008 मध्ये सुरू झाली. सदर योजना ही देशातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या मान्यताप्राप्त शाळांतील इ. ६ ते १२ विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक प्रगतीचे एक महत्वपूर्ण व्यासपीठ आहे.

INSPIRE- MANAK Award चे प्रमुख उद्देश्य :-

- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.
- स्थानिक व सामाजिक समस्यांवर उपाय शोधणे.
- ग्रामीण-शहरी विद्यार्थ्यांना समान संधी देणे.
- नवकल्पनांची परेसंस्था तयार करणे.
- वैज्ञानिक करियरसाठी प्रेरणा देणे.

INSPIRE- MANAK Award ची कार्यप्रणाली :

1) **शाळा नोंदणी** (School Registration) : प्रत्येक शाळा **INSPIRE** पोर्टलवर नोंदणी करते.
2) **आयडिया सबमिशन** (Idea Submission) : प्रत्येक शाळेतून 5 विद्यार्थी आपली Idea Submission करू शकतात.
3) **निर्गम** (Seed Money) : निवड झालेल्या विद्यार्थ्यांना **Model** तयार करण्यासाठी शासनाकडून प्रत्येकी रु. 10,000/- अनुदान दिले जाते.

प्रदर्शन स्तर :

- **DLEPC – (District Level Exhibition and Project Competition)** : जिल्हा स्तरावर मॉडेल्सचे सादरीकरण होते. या स्तरावरून 10% मॉडेल्सची राज्य स्तरासाठी निवड केली जाते.
- **SLEPC – (State Level Exhibition and Project Competition)** : राज्यातील विविध जिल्ह्यातून निवडलेले सर्वोत्तम 10% विद्यार्थी राज्य पातळीवर स्पर्धा करतात. या स्तरावरून 10% मॉडेल्सची राष्ट्रीय स्तरासाठी निवड केली जाते.
- **NLEPC – (National Level Exhibition and Project Competition)** : देशातील प्रत्येक राज्यातून निवडलेले सर्वोत्तम 10% विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करतात. या स्तरावर सर्वोत्तम (**Top**) 10% प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर सादर केले जातात.

पुरस्कार : राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, पुढील संशोधन संधी, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांमध्ये भेट देण्याची संधी दिली जाते. SAKURA Exchange Programme of Japan कार्यक्रमांतर्गत इन्स्पायर अवार्ड राष्ट्रीय प्रदर्शनातील पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना जपान देशाचा प्रवास करण्याची संधी DST कडून देण्यात येते.

योजनेचे कार्यान्वयन व संनियंत्रण : महाराष्ट्र राज्यात **राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर,**ही संस्था **State Nodal Agency**म्हणून कार्य करीत आहे.प्रत्येक जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी(माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक हे या योजनेचे जिल्हा समन्वयक अधिकारी आहेत.

INSPIRE- MANAK Award: 2025-26 चा अहवाल :

सन 2025-26 मध्ये महाराष्ट्र राज्याने एकूण ३७००० हजार ideas ची नोंदणी केली होती त्यापैकी २३०३ ideas ची निवड पुढील प्रक्रीयेकरिता झालेली आहे.

INSPIRE- MANAK Award अंतर्गत सन 2023-24 व 2024-25 मधील सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणे आहे.

- **जिल्हास्तरीय प्रदर्शन** (DLEPC): 2023-24 व 2024-25 :-

सन 2023-24 व 2024-25 या दोन वर्षातील ज्या विद्यार्थ्यांच्या **ideas** किंवा **prototype** ची निवड **NIF**, अहमदाबाद यांचेकडून झालेली होती त्या सर्व विद्यार्थ्यांना आपल्या **ideas** किंवा **prototype** चे प्रत्यक्ष सादरीकरण करण्यासाठी जिल्हास्तरीय प्रदर्शन व स्पर्धेचे दोन्ही वर्षाचे एकत्रित आयोजन करण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रात एकूण 22 जिल्ह्यांच्या ठिकाणी अशा प्रकारचे आयोजन करण्यात आले.

- आयोजक जिल्हे - एकूण 22 , कालावधी - दि. 10/11/2025 ते 20/11/2025
- सन 2023-24 ची जिल्हास्तरासाठी पात्र विद्यार्थी संख्या : 2149
- सन 2023-24ची जिल्हास्तरासाठी प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्या : 1538
- सन 2023-24ची मधील स्पर्धेतून राज्यस्तरासाठी निवड झालेली विद्यार्थी संख्या : 152
    - सन 2024-25 ची जिल्हास्तरासाठी पात्र विद्यार्थी संख्या : 2581
    - सन 2024-25 ची जिल्हास्तरासाठी प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्या : 2158
    - सन 2024-25 मधील स्पर्धेतून राज्यस्तरासाठी निवड झालेली विद्यार्थी संख्या : 216

- **राज्यस्तरीय प्रदर्शन** (DLEPC): 2023-24 व 2024-25 :-

आयोजक जिल्हा : भंडारा , स्थळ : एस.जी.बी. डिफेंस अॅकॅडमी व ज्यु. कॉलेज, शहापूर, जि. भंडारा

- कालावधी - दि. 27/11/2025 ते 29/11/2025
- सन 2023-24 ची राज्यस्तरासाठी पात्र विद्यार्थी संख्या : 152
- सन 2023-24ची राज्यस्तरासाठी प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्या : 143
- सन 2023-24ची मधील स्पर्धेतून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झालेली विद्यार्थी संख्या:14

- सन 2024-25 ची राज्यस्तरासाठी पात्र विद्यार्थी संख्या : 216
- सन 2024-25 ची राज्यस्तरासाठी प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्या : 211
- सन 2024-25 ची मधील स्पर्धेतून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झालेली विद्यार्थी संख्या:21

Mentoring Workshop : सन 2023-24 व 2024-25 मधील राष्ट्रीय स्तरासाठी निवड झालेल्या एकूण 35 विद्यार्थ्यांचे दोन दिवसीय मार्गदर्शन शिबिर (**Mentoring Workshop**) दि. 20/01/2026 ते 21/1/2026 या कालावधीत विश्वेशरय्या राष्ट्रीय प्रोद्योगिकी संस्थान (**VNIT**), नागपूर येथे घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांच्या **prototype** मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी विद्यार्थ्यांना तज्ञ मार्गदर्शकांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

सन 2023 – 24 मधील राष्ट्रीय स्तर (NLEPC) साठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी :

S.N.	Name of student	District	Exhibit Name
1	Akash Raosaheb Bothe	Ahilyanagar	Multiple Hole Maker for Mulching paper
2	Shradhha Ramesh Londhe	Ahilyanagar	AI based teacher assistant for Blinds
3	Anjali Aparna Kene	Chh. Sambhajinagar	Spacial dry and wet Drencher
4	Arnav Maharshi	Chh. Sambhajinagar	PRO SOS Keychain
5	Abhay Dhanaji Charapale	Kolhapur	Simple air compresser
6	Asawari Prashant Moon	Nagpur	Shock up school bags for school going students to keep their Posture perfect.
7	Sanchi Ganesh Bante	Nagpur	Classroom sound Propagator
8	Aaditya Amol Deshmukh	Pune	Innovative Kitchen designs for older people to cook who are disabled or in a wheel chair.
9	PRIYAL Pankaj Pagariya	Pune	Needle free injection
10	Rajwardhan Pradeep Kale	Sangli	Boat Protection Framework
11	Malhaar Vaibhav Bhongale	Satara	Nutri stove a unique design for healthy cooking practice.
12	Parth Hemant Chavan	Satara	Contractionable Steering wheel
13	Sai Shivaji kamble	Satara	Machine for Planting Crops
14	Shreyas Vijay Gole	Satara	Airport baggage Diverter System using QR

सन 2024–25 मधील राष्ट्रीय स्तर (NLEPC) साठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी :

S.N.	Name of student	District	Exhibit Name
1	Gargi Jayhari Garkal	Akola	Wind managing Hoarding
2	Avinash Ram Bavaskar	Amaravati	Integrated safety System for Vehicle Fuel Tank
3	Mahesh Sudhir Patil	Dhule	Emergency cycle pump
4	Keshavi Vijay Patil	Jalgaon	Two wheeler Seat belt and break
5	Sakshi ravindra Narheda	Jalana	Smart Cello tape
6	Janhavi Sanjay jadhav	Kolhapur	Electric Pole Worker Wireman Protection Sensor System
7	Mihir Rashmikant Desai	Mumbai South	Vibrating shoulder pain reducing bag
8	Shubh Bhavesh Bhalala	Mumbai Suburban	Pressure cooker with digital whistle record unit
9	Vedanti Deepak Wable	Pune	Modern safety door
10	Abhijit Mahesh Gawade	Pune	Drip ease Extraction
11	Geeta Ganapat Dhanavade	Pune	An innovative bicycle seat avoiding body pain
12	Devika Suhas Tad	Pune	Smart Automatic official mark or seal machine
13	Arnav Bhusari	Pune	The Auto clean Puplic Toilet
14	Asawari Amit Deogirkar	Ratnagiri	Use of Washing machine Drum for Cashew Roasting
15	Chaitrali Nandkumar Shinde	Sangli	Tree safety device while spraying
16	Prem navanath pasare	Sangli	Android based alcohol sensor engine lock using GSM
17	Shambhavi ramanappa Ajagunde	Solapur	Safe fly Gadget
18	Pranjal Umesh Bhilare	Thane	Bio bloom Investigator
19	Viraj Sandip Shinde	Washim	Smart Grain Care Kanagi
20	Manasvi Mohanrao Thakre	Wardha	Modified alarm clock
21	Mitali Krishna Magdum	Satara	Reverse Car camera Protective System


inspire
RAMANUJAN
C.V RAMAN
ISAAC NEWTON
ARYA BHATT
SHRUTA...


B-209
DISTRICT YEAR 2024 - 25







राज्यस्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२५-२६

दिनांक: ४ ऑक्टोबर २०२५

स्थळ: रमण सायन्स सेंटर अँड प्लॅनेटोरियम, नागपूर.

प्रस्तावना:

"विज्ञान म्हणजे केवळ ज्ञानाचा साठा नाही, तर ती विचार करण्याची एक पद्धत आहे." या उक्तीला अनुसरून, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी विकसित करणे आणि त्यांना जागतिक बदलांशी जोडून घेणे, हा 'अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा२०२५-२६ चा मुख्य उद्देश होता. आजचे युग हे तंत्रज्ञानाच्या विलक्षण वेगाचे युग आहे. अशा काळात 'क्वांटम तंत्रज्ञान' हे भविष्यातील विज्ञानाचा आधारस्तंभ मानले जात आहे. म्हणूनच, यावर्षीच्या मेळाव्यासाठी 'क्वांटम युगाची सुरुवात: संभाव्यता व आव्हाने' हा अत्यंत समयोचित आणि आव्हानात्मक विषय निवडण्यात आला.

विज्ञानाच्या क्षेत्रात दररोज नवनवीन शोध लागत असताना, भारताची तरुण पिढी या प्रवाहात कुठे उभी आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. क्वांटम फिजिक्समधील 'सुपरपोझिशन' आणि 'एन्टॉंगलमेंट' सारख्या गुंतागुंतीच्या संकल्पना शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना समजाव्यात आणि त्यांनी त्या सुलभ भाषेत मांडाव्यात, हा या स्पर्धेमागचा एक व्यापक दृष्टीकोन होता. रमण सायन्स सेंटर, नागपूर सारख्या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी स्थळी या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन होणे, हे विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला खतपाणी घालणारे ठरले.हा मेळावा केवळ एक स्पर्धा नव्हती, तर ते विचारांचे एक व्यासपीठ होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या १६ बालवैज्ञानिकांनी आपल्या कल्पकता, सखोल अभ्यास आणि वक्तृत्व कौशल्याच्या जोरावर या व्यासपीठावर विज्ञानाची पताका फडकवली. ६ मिनिटांच्या वेळेत विद्यार्थ्यांनी मांडलेले क्वांटम कम्प्युटिंग, माहिती सुरक्षा आणि वैद्यकीय क्षेत्रातील क्रांतीचे विचार हे त्यांच्या प्रगल्भतेची साक्ष देणारे होते.

मेळाव्याच्या माध्यमातून आपण केवळ स्पर्धक निवडले नाहीत, तर उद्याच्या भारताचे शास्त्रज्ञ आणि संशोधक घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. हा अहवाल त्याच वैज्ञानिक प्रवासाचा आणि विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कष्टांचा एक जिवंत दस्तावेज आहे.

कार्यक्रमाचे नियोजन आणि रूपरेषा (Event Planning and Framework)

अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे आयोजन हे केवळ एक स्पर्धा नसून, ती एक नियोजनबद्ध वैज्ञानिक प्रक्रिया होती. या राज्यस्तरीय स्पर्धेचे यजमानपद रमण सायन्स सेंटर, नागपूर या प्रतिष्ठित संस्थेकडे होते. कार्यक्रमाचे नियोजन मुख्यत्वे तीन टप्प्यांत करण्यात आले होते: पूर्वतयारी, अंमलबजावणी आणि मूल्यमापन.

१. पूर्वतयारी आणि निवड प्रक्रिया:

स्पर्धेचे नियोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या सुरुवातीपासूनच करण्यात आले होते. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रथम शाळा स्तर, त्यानंतर तालुका आणि जिल्हा स्तरावर स्पर्धा घेण्यात आल्या. महाराष्ट्रातील आठही प्रशासकीय विभागांतून (पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, लातूर आणि छत्रपती संभाजी नगर) अत्यंत चुरशीच्या स्पर्धेतून प्रत्येकी दोन सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड राज्यस्तरासाठी करण्यात आली.

२. तांत्रिक स्वरूप आणि नियमावली:

४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित या मेळाव्यासाठी 'इयत्ता ८ वी ते १० वी' हा वयोगट निश्चित करण्यात आला होता. एका शाळेतून केवळ एकाच विद्यार्थ्याला सहभागाची संधी देऊन स्पर्धेची व्यापकता वाढवण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयाची मांडणी करण्यासाठी ६ मिनिटांचा वेळ आणि त्यानंतर परीक्षकांशी संवाद साधण्यासाठी २ मिनिटांचा वेळ आरक्षित ठेवण्यात आला होता. भाषा निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य देऊन विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला प्राधान्य देण्यात आले.

३. मूल्यमापन आराखडा:

नियोजनातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे बहुआयामी गुणदान पद्धती. केवळ वक्तृत्वच नव्हे, तर विद्यार्थ्यांची वैज्ञानिक समज तपासण्यासाठी १०० गुणांचा एक विस्तृत आराखडा तयार केला गेला. यात वैज्ञानिक अचूकता (४० गुण), दृक-श्राव्य साधनांचा वापर (१५ गुण), प्रभावी सादरीकरण (२५ गुण), लेखी आशय क्षमता चाचणी (१० गुण) आणि तोंडी प्रश्नोत्तरे (१० गुण) यांचा समावेश होता. अशा प्रकारे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वैज्ञानिक कौशल्याची चाचणी घेणारे एक आदर्श नियोजन या मेळाव्याच्या निमित्ताने साकारण्यात आले.

निकाल आणि विजेते

या चुरशीच्या स्पर्धेत मुंबईच्या **श्रेणी सेठ** या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावला, तर एकूण सहा विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली.

प्रथम क्रमांक:

श्रेणी सेठ (चिल्ड्रन्स अकॅडमी, मालाड, मुंबई)

प्रोत्साहनपर (Consolation) बक्षिसे:

१. **अनुष्का जाधव**: केशवराव मोरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सर्वेदे, ता. राधानगरी, कोल्हापूर.

२. **उन्मेश परेश देशमुख**: ऑर्चिड पब्लिक स्कूल, काटोल, नागपूर.

३. **कृष्णाली विवेक**: कमलाबाई कन्या विद्यालय, धुळे.

४. **सय्यद साना सय्यद आसिफ**: अब्दुल रहीम नॅशनल उर्दू हायस्कूल, छत्रपती संभाजी नगर.

५. **अनन्या अविनाश जाधव**: सरस्वती विद्यालय, तमलवाडी, ता. तुळजापूर, धाराशिव.

६. **गार्गी जयहरी गरकल**: प्रभात किड्स स्कूल, अकोला.

सहभागी विद्यार्थ्यांची यादी :

१) स्वरूप विठ्ठल उंबरकर - जागृती ज्ञानपीठ आंबेटकली खामगाव

२) गार्गी जयहरी गारकल -प्रभात किड्स स्कूल अकोला,

३) सय्यद साना सय्यद आसिफ- अब्दुल रहीम नॅशनल उर्दू हायस्कूल छत्रपती संभाजी नगर

४) हर्षदा नीलकंठ कष्टे - ज्ञानपीठ माध्यमिक विद्यालय सेलू

५) अक्षरा अमोल पाटील- बिसूर हायस्कूल बिसूर

६) अनुष्का रवींद्र जाधव- किसनराव मोरे हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज सरावदे, कोल्हापूर

७) अनन्या अविनाश जाधव -सरस्वती विद्यालय तमलवाडी तालुका तुळजापूर जिल्हा धाराशिव

८) पद्मजा शाम कांबळे- श्री गोधवनीदेवी लाहोती कन्या विद्यालय लातूर

९) झरा जमीन शेख -चिल्ड्रन्स वेल्फेअर सेंटर हायस्कूल यारी रोड वेअर सोवा अंधेरी वेस्ट मुंबई

१०) श्रेणी निर्लय सेठ -चिल्ड्रन्स अकॅडमी मलाड मुंबई

११) वैष्णवी नामदेव धकाते -जीवन विकास वनिता विद्यालय उमरेड जिल्हा नागपूर

१२) उन्मेष देशमुख -ऑर्चिड पब्लिक स्कूल काटोल नागपूर

१३) नक्षत्रा बालकृष्ण कापुरे –विवेकानंद विद्यालय चोपडा नाशिक

१४) कृष्णाली विवेक खानखारी -कमलाबाई गर्ल्स हायस्कूल नाशिक

१५) अर्श सुसोन सोनवणे - सेंट जोसेफ बॉईज हायस्कूल काडकी पुणे

१६) कदम विराज मालवंत- श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय देवडी प्रवरा, पुणे






AI


QUANTUM COMPUTING


राज्यस्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा 2025 - 26
AI

राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२५-२६

स्थळ: श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

दिनांक : २८ ऑक्टोबर २०२५

उद्देश: विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे आणि नाटकाच्या माध्यमातून विज्ञानाचा प्रसार करणे.

प्रस्तावना

विज्ञान ही केवळ पुस्तकी संकल्पना नसून ती जीवनाची एक प्रगत शैली आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी आणि विज्ञानातील क्लिष्ट विषय मनोरंजनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी 'राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२५२६ चे आयोजन करण्यात आले. २८ ऑक्टोबर २०२५रोजी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे पार पडलेला हा उत्सव वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाट्यकला यांचा एक अपूर्व संगम होता.

या महोत्सवाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना तांत्रिक माहितीचे (Technological Information) सादरीकरण करण्यास व्यासपीठ मिळवून देणे हा होता. महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, अमरावती, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर या आठही विभागांतील गुणवंत विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. विज्ञानाचा प्रसार जनमानसात करण्यासाठी नाटक हे एक प्रभावी माध्यम ठरू शकते, हा विश्वास या उपक्रमातून सार्थ झाला आहे. सादर झालेल्या नाटिकांमधून केवळ अभिनयच नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि सामाजिक प्रश्नांवर विज्ञानाच्या आधारे शोधलेले उपाय यांचे उत्कृष्ट दर्शन घडले. हा अहवाल त्याच सर्जनशील प्रवासाचा आणि त्यातून निष्पन्न झालेल्या निकालांचा लेखाजोखा मांडणारा आहे.

राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील एकूण ८ प्रशासकीय विभागांनी सहभाग घेतला होता. या विभागांची सविस्तर माहिती आणि त्यांचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे:

सहभागी विभागांची माहिती

या महोत्सवात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या संघांनी आपापल्या विभागाचे प्रतिनिधित्व केले. हे विभाग खालीलप्रमाणे आहेत:

१. पुणे विभाग: शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विभागातील विद्यार्थ्यांनी विज्ञानातील आधुनिक विषयांवर सादरीकरण केले.

२. मुंबई विभाग: तंत्रज्ञान आणि वेगवान जीवनशैलीचे प्रतिबिंब मुंबईच्या नाटिकांमधून उमटले. या विभागाने स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

३. कोल्हापूर विभाग: या विभागाने अत्यंत प्रभावी कामगिरी केली. कोल्हापूर विभागातील सांगली येथील संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून बाजी मारली.

४. नाशिक विभाग: उत्तर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या विभागाने विज्ञानातील सामाजिक विषयांवर भर दिला.

५. नागपूर विभाग: विदर्भाचे प्रमुख केंद्र असलेल्या नागपूर विभागातील विद्यार्थ्यांनी तांत्रिक माहिती आणि अभिनय यांचा उत्तम मेळ घातला.

६. अमरावती विभाग: या महोत्सवाचे यजमानपद अमरावती विभागाकडे होते. स्थानिक स्तरावर विज्ञानाचा प्रसार करण्यात या विभागाचा मोठा वाटा राहिला.

७. छत्रपती संभाजीनगर विभाग: मराठवाड्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या विभागाने आपल्या नाटिके द्वारे वैज्ञानिक दृष्टिकोन मांडला.

८. लातूर विभाग: शैक्षणिक पॅटर्नसाठी प्रसिद्ध असलेल्या लातूर विभागातील विद्यार्थ्यांनी कल्पकतेने वैज्ञानिक प्रयोग नाटकातून मांडले.

सहभागाचे स्वरूप

शासनमान्य शाळेत नियमित शिकणारे इयत्ता सहावी ते दहावी पर्यंतचे विद्यार्थी यात भाग घेऊ शकतात

विद्यार्थी संख्या: प्रत्येक विभागातून निवडक ८ विद्यार्थ्यांचा संच असून ६३ विद्यार्थी सहभागी झाले होते.

सादरीकरणाचा विषय: मानव कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान (Science and Technology for the benefit of mankind) हा असून त्या अंतर्गत पुढील प्रमाणे पाच उपविषय दिलेले आहेत .

१) **विज्ञानातील महिला**
२) **स्मार्ट (नाविन्यपूर्ण)शेती**
३) **डिजिटल भारत जीवन सक्षमीकरण**
४) **सर्वांसाठी स्वच्छता**
५) **हरित तंत्रज्ञान**

प्रत्येक संघाने विज्ञानाशी संबंधित तांत्रिक माहिती (Technological Information) आणि सामाजिक संदेश देणाऱ्या नाटिका सादर केल्या.

निवड प्रक्रिया: तालुकास्तर , जिल्हास्तर आणि त्यानंतर विभागस्तरावर प्रथम आलेला संघ राज्यस्तरीय नाट्योत्सवासाठी पात्र ठरतो.

मूल्यमापन पद्धती आणि निकष

राज्यस्तरीय नाट्योत्सवाचे मूल्यमापन अत्यंत पारदर्शक आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्यात आले. कोणत्याही नाटिकेचे यश हे केवळ अभिनयावर अवलंबून नसून, त्यातील वैज्ञानिक सत्यता आणि सादरीकरणाच्या तंत्रावर आधारित असते. त्यासाठी एकूण १०० गुणांचे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये सर्वाधिक ५० गुण नाटकाच्या सर्वांगीण सादरीकरणासाठी (अभिनय, दिग्दर्शन, संवादफेक) देण्यात आले.विज्ञानाचा प्रसार हा मुख्य उद्देश असल्याने, नाटकातून दिली जाणारी वैज्ञानिक माहिती आणि तांत्रिक अचूकता यासाठी ३० गुण राखीव ठेवण्यात आले होते. उरलेले २० गुण नाटकाची परिणामकारकता आणि त्यातून मिळणारा सामाजिक संदेश यावर आधारित होते.

या स्पर्धेचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे, तांत्रिक मदतीसाठी लागणारे पोस्टर्स, बॅनर्स आणि पार्श्वभूमी सजावट (Props) विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करणे बंधनकारक होते. यातून विद्यार्थ्यांची विषयावरील पकड आणि त्यांची सर्जनशीलता तपासण्यात आली. अशाप्रकारे कला आणि विज्ञान यांचा समतोल साधणाऱ्या संघांची विजेते म्हणून निवड करण्यात आली.

निकाल आणि विजेत्यांचा सविस्तर वृत्तांत

राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२५ चा निकाल अत्यंत चुरशीचा ठरला. या स्पर्धेत महाराष्ट्रातील आठही प्रशासकीय विभागांच्या विजेत्या संघांनी विज्ञानातील तांत्रिक विषयांवर आधारित दर्जेदार नाटिका सादर केल्या. परीक्षकांनी अभिनय, वैज्ञानिक अचूकता आणि सादरीकरणाची परिणामकारकता या निकषांवर आधारित खालीलप्रमाणे विजेते घोषित केले:

१. मुख्य पारितोषिके:

या स्पर्धेत कोल्हापूर विभागाने आपले वर्चस्व सिद्ध केले. **शांतीनिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, सांगली** या शाळेने आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाद्वारे प्रथम क्रमांक पटकावला. तंत्रज्ञान आणि विज्ञानाचा सुवर्णमध्य साधल्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले. मुंबई विभागातील **पार्ले टिळक इंग्रजी माध्यमिक विद्यालय मुंबई** यांनी द्वितीय क्रमांक मिळवून आपल्या तांत्रिक कौशल्याची मोहोर उमटवली. तसेच, तृतीय क्रमांकाचा बहुमान **न्यू इंग्लिश स्कूल लांडेवाडी ता.आंबेगाव पुणे** या संघाने संपादन केला.

२. विशेष वैयक्तिक नैपुण्य पुरस्कार:

सांघिक यशासोबतच वैयक्तिक कामगिरीचीही दखल घेण्यात आली. यामध्ये **केतकी चव्हाण,** शांतीनिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या मंदिर ,सांगली हिला **उत्कृष्ट नटी** व **रुद्रश्री मांदिलकर** न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी त.आंबेवाडी पुणे मधील विद्यार्थ्याला त्याच्या प्रभावी सादरीकरणासाठी '**उत्कृष्ट नट**' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, **डॉ. विज्ञापना गोकर्णकर पार्ले टिळक इंग्रजी पार्ले माध्यमिक विद्यालय मुंबई**यांनीनाटकाची उत्तम पटकथा लिहल्या मुळे **उत्कृष्ट पटकथा** म्हणून गौरविण्यात आले. उत्कृष्ट नाटकाच्या विषयाला योग्य दिशा देणाऱ्या **श्री संजय बामणे** शांतीनिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, सांगली च्या मार्गदर्शकाला '**उत्कृष्ट दिग्दर्शक**' म्हणून गौरविण्यात आले.

या निकालातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक जाणीव आणि नाट्यकलेचा प्रभावी वापर अधोरेखित झाला. यातील प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या संघाची निवड पश्चिम क्षेत्रीय स्पर्धेसाठी करण्यात आली.






राज्यस्तरीय
विज्ञान
2025-26


British Lab.
1925
राज्यस्तरीय
विज्ञान
नाट्योत्सव
2025-26
State Level
Science Drama
डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती विज्ञान केंद्र, अमरावती
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
State Level Science Drama Festiv
विषय: मानव कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञा
(Science and Technology for the benefit of Man
मंगळवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२५



५३ वी राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६

प्रदर्शनाची पार्श्वभूमी आणि स्वरूप :

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली देशातील इयत्ता सहावी ते बारावी (प्राथमिक-माध्यमिक) च्या विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कल्पकता आणि विज्ञान व गणितातील नवनिर्मितीच्या वृत्तीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवत असते.राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शन हा या उपक्रमाचा एक भाग आहे. यामध्ये देशभरातील सर्व राज्यांमधून राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनात निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये निवडक विद्यार्थ्यांना संधी दिली जाते.राज्यस्तरीय प्रदर्शनाची सुरुवात ही तालुकास्तरापासून होते. तालुकास्तरावरील विजयी विद्यार्थी जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनात सहभागी होतात. जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनात विजयी झालेले विद्यार्थी राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनात सहभागी होतात.

प्रदर्शनाची प्रमुख उद्दिष्टे

1) विद्यार्थ्यांना त्यांच्या नैसर्गिक जिज्ञासा आणि सर्जनशीलतेसाठी एक व्यासपीठ प्रदान करणे.

2) विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूच्या घडामोडींमध्ये विज्ञान आणि गणिताची अनुभूती मिळावी आणि त्याचा उपयोग केवळ देशाच्या आर्थिक विकासातच नव्हे तर समाजात प्रचलित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी करता येईल याची जाणीव करून देणे.

3) स्वावलंबन, सामाजिक-आर्थिक आणि सामाजिक-पर्यावरणीय विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी विज्ञान, गणित आणि तंत्रज्ञानाच्या विकासाकडे मुख्य साधन म्हणून पाहण्यावर भर देणे.

4) विद्यार्थ्यांना राष्ट्राच्या भवितव्याबद्दल दूरदर्शी बनवणे आणि त्यांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक होण्यासाठी प्रोत्साहित करणे.

5) विविध लोक, संस्कृती, समाज आणि वातावरणामुळे विज्ञान कसे विकसित झाले आहे आणि प्रभावित झाले आहे हे मुलांना समजण्यास मदत करणे.

6) आजच्या वातावरणात निरोगी आणि शाश्वत समाज राखण्यासाठी जागतिक समस्यांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये गंभीर विचार विकसित करणे.

7) कृषी, खते, अन्नप्रक्रिया, जैवतंत्रज्ञान, हरित ऊर्जा, आपत्ती व्यवस्थापन, माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान, खगोलशास्त्र, वाहतूक, क्रीडा आणि हवामान बदलांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी विज्ञान आणि गणिताचा उपयोग नवीन उपाय शोधण्यासाठी केला जाऊ शकतो हा विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे.

8) पर्यावरणीय समस्या आणि आव्हाने याबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि समस्यांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण कल्पना तयार करण्यासाठी मुलांना प्रेरित करणे.

५३ वे राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन २०२५-२६

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती या संस्थेद्वारा संचालित

विज्ञान महाविद्यालय, काँग्रेस नगर, नागपूर

कालावधी : २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६

NCERT, नवी दिल्ली यांचे मार्फत २०२५-२६ करिता या प्रदर्शनाचा **मुख्य विषय विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी STEM हा** निश्चित केला आहे. सामाजिक पर्यावरणास अनुकूल आणि सध्याच्या काळाची गरज लक्षात घेऊन मुख्य विषयाला अनुसरून पुढील प्रमाणे एकूण 07 उपविषय निर्धारित करण्यात आले होते.

1) शाश्वत शेती

2) कचरा व्यवस्थापन व प्लास्टिकला पर्याय

3) हरित ऊर्जा

4) उदयोन्मुख तंत्रज्ञान

5) मनोरंजक गणितीय मॉडेलिंग

6) आरोग्य आणि स्वच्छता

7) जलसंवर्धन आणि व्यवस्थापन

महाराष्ट्र राज्यातील गणित व विज्ञान शिक्षकांना अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी सन 2006-07 पासून राज्यस्तरीय अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात येते. तसेच प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर यांच्यासाठी सुद्धा गणित व विज्ञान वैज्ञानिक उपकरण प्रतिकृतीचे प्रदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात येते. राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनात राज्यातील 34 जिल्हे आणि मुंबईतील तीन उपविभाग अशा एकूण 37 जिल्ह्यातील विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होतात.

आदिवासी भाग असलेल्या प्रत्येक जिल्ह्यातून 10 विद्यार्थी व बिगर आदिवासी भाग असलेल्या प्रत्येक जिल्ह्यातून 08 विद्यार्थी या प्रदर्शनात सहभागी होतात. या प्रदर्शनात सहभाग घेणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांची गटनिहाय संख्या पुढील प्रमाणे आहे.

1) प्राथमिक विद्यार्थी गट-111 विद्यार्थी

2) प्राथमिक विद्यार्थी गट (आदिवासी क्षेत्र)- 16 विद्यार्थी

3) प्राथमिक विद्यार्थी गट (दिव्यांग)-37 विद्यार्थी

4) माध्यमिक विद्यार्थी गट-111 विद्यार्थी

5) माध्यमिक विद्यार्थी गट (आदिवासी क्षेत्र)- 16 विद्यार्थी

6) माध्यमिक विद्यार्थी गट- (दिव्यांग)-37 विद्यार्थी

7) प्राथमिक शिक्षक (शैक्षणिक साहित्य)-37 शिक्षक

8) माध्यमिक शिक्षक (शैक्षणिक साहित्य)-37 शिक्षक

9) प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर-37

असे एकूण 328 विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रतिकृतींचे व नवनिर्मितीचे प्रदर्शन या प्रदर्शनीतून करण्यात आले. तसेच 111 शिक्षक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांनी आपले विविध शैक्षणिक आणि वैज्ञानिक साहित्य प्रदर्शित केले .याप्रमाणे राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनात एकूण 439 वैज्ञानिक प्रतिकृतींचा सहभागी अपेक्षित होता. त्यापैकी एकूण 408 प्रतिकृती प्रत्यक्ष सहभागी झाल्यात. राज्यस्तरीय प्रदर्शनाच्या परीक्षणासाठी एकूण 40 परीक्षकांची नेमणूक करण्यात आली. .या प्रदर्शनाला 37 जिल्ह्यातील जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी हे उपस्थित झाले .त्याचप्रमाणे 37 जिल्ह्यातून इन्स्पायर चे 37 प्रतिनिधी सुद्धा या प्रदर्शनात उपस्थित होते .विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाचा लाभ घेता यावा व त्यांनाही नवनिर्मितीची प्रेरणा मिळावी या हेतूने दररोज 1000- 1200 विद्यार्थी, शिक्षक विज्ञानप्रेमी, पालक यांनी भेटी दिल्या. या प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांसोबतच महाराष्ट्र राज्यातील विविध स्वयंसेवी संस्था, विज्ञान संस्था, उपक्रमशील शिक्षक हे स्टॉलच्या माध्यमातून महाराष्ट्रातील संस्कृती, परंपरा, विज्ञान व गणिताच्या अध्यापनातील नाविन्यपूर्ण कल्पना, नाविन्यपूर्ण प्रयोगाच्या माध्यमातून गणित व विज्ञान विषयातील पायाभूत संकल्पनांचे स्पष्टीकरण यांचे प्रदर्शन केले .

या प्रदर्शनी काळात सकाळी 09.00 ते 10.00 या वेळेत विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत व्यक्तींसोबत संवाद साधण्याची संधी (Science Talk) च्या माध्यमातून दिली.

तसेच राज्यभरातून आलेल्या विद्यार्थ्यांचे मनोरंजन व्हावे, येथील स्थानिक कलांचा, परंपरांचा आलेल्या विद्यार्थ्यांना परिचय व्हावा या उद्देशाने प्रदर्शनाच्या कालावधीत दररोज संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . तज्ञ परीक्षकांच्या माध्यमातून सखोल परीक्षण प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रदर्शनीमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांची यादी पुढील प्रमाणे आहे.

अंतिम निकाल उच्च प्राथमिक गट (वर्ग ६ ते ८) सर्वसाधारण

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	मार्गदर्शक शिक्षक	क्रमांक
1	मोहित महेश राऊत	ग्रामीण विकास विद्यालय, सालवा, त. मौदा, जि. नागपूर	नागपूर	स्मार्ट वॉटर मॅनेजमेंट सिस्टीम फॉर पब्लिक प्लेसेस	लक्ष्मीकांत बांते	**प्रथम**
2	श्याम प्रवीण इंगळे	जि. प. शाळा , माहुली जहांगीर, ता. अमरावती	अमरावती	खेळातून विद्युत निर्मिती	शैलजा फुरसुले	**द्वितीय**
3	स्मित संदेश केळुस्कर	सेंट जोसेफ हाय स्कूल, मालाड ओर्लेम	मुंबई पश्चिम	टेस्सेलेशन (शेप्स टू सोल्यूशन्स)	मॉरीन फर्डिनांड ब्युथेलो	तृतीय
4	अर्चित विक्रांत वनमाली	भारतीय विद्या भवन लॉयडस विद्या निकेतन	वर्धा	इंटीग्रेटेड मल्टी डिज़ास्टर डिटेक्शन एंड अर्ली अलर्ट सिस्टम	पूजा शुक्ला	**चतुर्थ**
5	कुमार स्पंदन शर्वरी गौरव धामणे	रोटरी इंग्लिश मिडीयम स्कूल, खेड	रत्नागिरी	CASHEWSHELLORA - कॅश्यूशेलोरा	सौ शर्वरी गौरव धामणे	**उत्तेजनार्थ** -1
6	शर्वरी रामनाथ मस्के	शहर्तकाळी हायस्कूल, शहर्तकाळी	अहिल्या नगर	Eco-friendly biodegradable pots	अनिता भालेराव दारकुंडे	**उत्तेजनार्थ** -2
7	ध्रुव गणेश बारहाते	पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा इरळद	परभणी	सेंद्रिय औष्णिक ऊर्जा व वापर	मयुरी स्वप्निल देशमुख	**उत्तेजनार्थ** -3

अंतिम निकाल उच्च प्राथमिक गट (वर्ग ६ ते ८) दिव्यांग

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	मार्गदर्शक शिक्षक	क्रमांक
1	कार्तिक अशोक साकट	न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल,कर्जत	अहिल्या नगर	Ai speaking robot	सिद्धार्थ शामसुंदर पारसेकर	1. प्रथम
2	वेदिका राजेंद्र मोरे	साधना माध्यमिक विद्यालय कासोदा तालुका एरंडोल जिल्हा जळगाव	जळगाव	महिला सुरक्षा यंत्र (शूज आणि पर्स)	श्रीमती स्वाती हिम्मतराव ढोले	2. उत्तेजनार्थ -1

अंतिम निकाल उच्च प्राथमिक गट (वर्ग ६ ते ८) आदिवासी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	मार्गदर्शक शिक्षक	क्रमांक
1	आयुष गणेश गावित	अनु. प्राथ. माध्य. आश्रम शाळा सोनखांब ता. नवापूर जिल्हा नंदुरबार	नंदुरबार	ट्रायबल चाइल्ड हेल्थ शिल्ड (आदिवासी बालकांचा सुरक्षा कवच)	कुमारयोगेश रोहिदास खर्डे	**प्रथम**
2	कु. तन्वी पुरुषोत्तम परशुरामकर	सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अर्जुनी/मोरगाव.	गोंदिया	आप्टिमायझिंग कंपोस्ट प्रोडक्शन फ्रॉम यूज्ड सॅनिटरी नॅपकिन्स/पॅड्स	श्री अमर अविनाश वसाके	**उत्तेजनार्थ -1**

अंतिम निकाल माध्यमिक व उच्च माध्यमिक गट (वर्ग ९ ते १२) सर्वसाधारण

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	मार्गदर्शक शिक्षक	क्रमांक
1	अनिरुद्ध संतोष देसाई	गडहिंग्लज हायस्कूल गडहिंग्लज	कोल्हापूर	सस्टेनेबल फार्मिंग युजिंग रोबोट	कृष्णा तुकाराम शिवणे	**प्रथम**
2	ओमंकार सुरेश फडतरे	के.एस.एम. कनिष्ठ महाविद्यालय नागनहळ्ळी ता - अक्कलकोट	सोलापूर	Smart Agriculture	नवले रविंद्र गूरण्णा	**द्वितीय**
3	रोशन ज्ञानदेव वाशिवले	ज्ञानदीप स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज पसरणी, वाई	सातारा	स्मार्ट मल्टीपर्पजस्टिक फॉर एल्डरली पीपल	कु.लीना गोपाळराव जाधव	**तृतीय**
4	सारंग विपुल सावे	आय.ई.एस. व्ही.एन.सुळे गुरुजी इंग्रजी माध्यमिक शाळा	मुंबई दक्षिण	रिमोटने चालवले जाणारे वाहन	श्रीमती नजमा कुरेशी	**चतुर्थ**
5	वरद सुदाम भालेराव	भारतीय बाल विद्या मंदिर, प्रभावती नगर, परभणी	परभणी	डिझास्टर रोव्हर अँड मिलिटरी डिफेन्स	वर्षाराणी बाबुराव चव्हाण	**उत्तेजनार्थ** -1
6	श्रीतेज राहुल राऊत	रयत इंग्लीश मिडीयम स्कूल कराड	सातारा	शेतकरी अँप	सुशांत लिलाधर चव्हाण	**उत्तेजनार्थ** -2
7	मानीत चिंतन गडा	शेठ वीरचंद धनजी देवशी सेकंडरी इंग्लिश माध्यम शाळा	मुंबई उत्तर	वर्ल्ड ऑफ फ्रेग्रन्स	शुभा गोपालकृष्णन अय्यर	**उत्तेजनार्थ** -3

अंतिम निकाल माध्यमिक व उच्च माध्यमिक गट (वर्ग ९ ते १२) दिव्यांग

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	मार्गदर्शक शिक्षक	क्रमांक
1	कुमारी दक्षिणी गजानन चंद्रे	पीएमश्री जिल्हा परिषद प्रशाला गणोरी	छ. संभाजी नगर	रोपवाटिकांसाठी पर्यावरणपूरक कुंड्या	श्रीमती शैलजा देविदास नाईकवाडे	**प्रथम**
2	कस्तुरी योगेश भोईर ,	प्रतिभा विद्यामंदिर खानिवडे	पालघर	नैसर्गिक अन्नसुरक्षा (Natural food security)	नंदकुमार गणपत मांद्रे	**उत्तेजनार्थ** -1

अंतिम निकाल माध्यमिक व उच्च माध्यमिक गट (वर्ग ९ ते १२) आदिवासी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	मार्गदर्शक शिक्षक	क्रमांक
1	अंबिका महादेव धुडे	बाबासाहेब देशमुख विद्यालय पहापळ ता. पांढरकवडा	यवतमाळ	पी. सी. एम. आधारित सौरऊर्जेवर चालणारा हिमप्रदेशासाठी उष्णतायुक्त तंबू	निलेश भास्करराव लिखार	**प्रथम**
2	आर्यन केशराम पावरा	अनुदानित आश्रम शाळा, अनेर्दाम	धुळे	सेफ्टी इंडियन आर्मी	एच. एफ. अहिरे	**उत्तेजनार्थ** -1

अंतिम निकाल प्राथमिक शिक्षक गट (शैक्षणिक साहित्य)

अ.क्र.	शिक्षकांचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	क्रमांक
1	संदीप तुळशीदास पालके	जयहिंद विद्यालय,क. तडवळे	धाराशिव	कर्मवीर मॅथ एक्सप्रेस	**प्रथम**
2	श्री. संतोष काशिराम चव्हाण	जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा पिरंदवणे नं. 1	रत्नागिरी	निपुण गणित प्रयोगशाळा	**द्वितीय**
3	सौ.कांचन दिलीप पिंगळे	विद्यानिधी व्रजलाल पारेख हायस्कूल, जुहू मराठी माध्यम.	मुंबई पश्चिम	हिरवाईचे रहस्य	**उत्तेजनार्थ** -1
4	श्री विशाल विष्णुदास रेपाळ	जि. प. प्राथमिक शाळा अलंकापुरी, करकंब.	सोलापूर	My Maths School माझी गणित शाळा	**उत्तेजनार्थ** -2
5	निलेश श्रावण इंगोले	सरस्वती प्राथमिक शाळा, चांदुर रेल्वे	अमरावती	मनोरंजनातून गणित व विज्ञान	**उत्तेजनार्थ** -3

अंतिम निकाल माध्यमिक शिक्षक गट (शैक्षणिक साहित्य)

अ.क्र.	शिक्षकांचे नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	क्रमांक
1	विकास पुंडलिक सरकाळे	क्रांतिदेवी सावित्रीबाई फुले विद्यालय नणंद	लातूर	मोबाईल अँप आणि 3d बुक	**प्रथम**
2	राजेंद्रकुमार वैकुंठम गणपुरपु	शासकीय माध्यमिक आश्रमशाळा मुलचेरा	गडचिरोली	लर्निंग सायन्स विथ फन्	**द्वितीय**
3	चैतन्य महादेव सुकी	श्री देवी सातेरी हायस्कुल, वेतोरे	सिंधुदुर्ग	वर्तुळाचे गणित (ए टू झेड वर्तुळ)	**उत्तेजनार्थ** -1
4	भरत अंकुश पाटील	मा. विठ्ठलराव पटवर्धन उत्कर्ष आश्रमशाळा वाघेरा, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक	नाशिक	रसायनशास्त्रातील संकल्पना सहज व सोप्या पद्धतीने अभ्यासणे.	**उत्तेजनार्थ** -2
5	रीना व्यंकटेश शेट्टी	आय.डी.यू.बी.एस.जूनियर कॉलेज	मुंबई उत्तर	कॅनिक सेक्शन :: कोन २ कर्व पवेलियन	**उत्तेजनार्थ** -3

अंतिम निकाल प्रयोगशाळा गट (प्रायोगिक साहित्य)

अ.क्र.	प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर नाव	शाळेचे नाव व पत्ता	जिल्हा	प्रतिकृतीचे नाव	क्रमांक
1	गणेश प्रभाकर बदखल	लोक विद्यालय चालबर्डी रे	चंद्रपूर	विद्यार्थ्यांना शिकवूया स्मार्ट तंत्रज्ञान	**प्रथम**
2	भास्कर अनंत भगत	सेंट जोसेफ स्कूल.मार्वे रोड, ओर्लेम, मालाड (प) मुंबई -६४	मुंबई पश्चिम	चला प्रयोग करू या	**द्वितीय**
3	श्री. विजय जयवंत पाटील	ज्ञानदीप विद्यामंदिर वालीव, वसई रोड (पूर्व), ता. वसई, जि. पालघर.	पालघर	सजीवांतील अलैंगिक व लैंगिक प्रजनन प्रक्रिया.	**उत्तेजनार्थ** -1
4	जुनैद कलीम अहमद	दि मालेगाव हाये स्कूल अँड जुनिअर कॉलेज मालेगाव	नाशिक	DOUBLE - I (डॉब्ल आये)	**उत्तेजनार्थ** -2
5	भरत सोमनाथ घोरपडे	विज्ञान साहित्य टॉली व शैक्षणिक साहित्य	पुणे	सायन्स एक्सपेरियमेंट ट्रॉली	**उत्तेजनार्थ** -3

बालवैज्ञानिकांच्या स्वप्नांना मिळाले पंख : विज्ञानप्रेमी महाराष्ट्र घडविणाऱ्या शासनाच्या नाविन्यपूर्ण प्रेरणादायी योजना

"विज्ञान ही केवळ ज्ञानाची शाखा नसून ती राष्ट्राच्या प्रगतीची, विकासाची आणि आत्मनिर्भरतेची खरी शक्ती आहे." आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), अवकाश तंत्रज्ञान, रोबोटिक्स, जैवतंत्रज्ञान, डेटा विज्ञान आणि नवोपक्रम यांच्या आधारे जागतिक स्पर्धा अधिक तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचारसरणी, संशोधनवृत्ती आणि नवसर्जनाची क्षमता विकसित करणे ही केवळ शिक्षण व्यवस्थेची अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन आणि नवोपक्रम यांविषयी आकर्षण निर्माण करून त्यांना अनुभवाधारित शिक्षणाच्या माध्यमातून भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर विविध विज्ञानविषयक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये ***राष्ट्रीय बालवैज्ञानिक प्रदर्शन*** हा अत्यंत महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा उपक्रम मानला जातो. महाराष्ट्रातही तालुकास्तर, जिल्हास्तर आणि राज्यस्तर अशा टप्प्यांमधून या प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येते. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना, संशोधन, प्रयोग आणि नवकल्पनांचे सादरीकरण करण्याची संधी मिळते तसेच राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग खुला होतो.मात्र विज्ञान क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक व्यापक प्रोत्साहन मिळणे, विज्ञान प्रदर्शनांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढणे आणि ग्रामीण, आदिवासी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांनाही विज्ञानाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही काळाची गरज होती. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला योग्य दिशा मिळावी, विज्ञानाकडे करिअर म्हणून पाहण्याची प्रेरणा मिळावी आणि त्यांच्या मनात संशोधनाची जिज्ञासा जागृत व्हावी यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करणे आवश्यक होते.

हीच गरज ओळखून महाराष्ट्र शासनाने अलीकडेच दोन अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनीतील पारितोषिकांच्या रकमेत लक्षणीय वाढ करून विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक आणि परिचर यांच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे या प्रदर्शनी तील यशाला अधिक प्रतिष्ठा आणि प्रोत्साहन प्राप्त झाले आहे. यासोबतच **"मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी"** हा अभिनव उपक्रम सुरू करून विज्ञान प्रदर्शनातील गुणवंत विद्यार्थ्यांना राज्यातील विज्ञान केंद्रे, भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) आणि जगप्रसिद्ध नासा (NASA) यांसारख्या संस्थांना प्रत्यक्ष भेट देण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे या उपक्रमांमध्ये सर्वसामान्य, आदिवासी आणि दिव्यांग विद्यार्थ्यांचा तसेच शैक्षणिक साहित्य गटात सहभागी होणारे शिक्षक आणि प्रयोगशाळा परिचर या सर्वांचा समावेश करून शासनाने विज्ञान शिक्षणातील समावेशकतेचा आदर्श निर्माण केला आहे. तालुकास्तरावरील विद्यार्थ्यांना विज्ञान केंद्रांची भेट, जिल्हास्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांना इस्रो भेट आणि राज्यस्तरीय उत्कृष्ट विद्यार्थ्यांना नासा भेट अशा संधी उपलब्ध करून देत शासनाने विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना अक्षरशः आकाशाची झेप दिली आहे. विज्ञान प्रदर्शनीतील सहभाग आता केवळ स्पर्धेपुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देणारा आणि त्यांच्या करिअरचा पाया मजबूत करणारा अनुभव ठरणार आहे.

विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी प्रेम निर्माण करणे, संशोधनाची आवड जागृत करणे आणि महाराष्ट्राला विज्ञान व नवोपक्रम क्षेत्रात अग्रगण्य राज्य म्हणून घडविणे या व्यापक दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने उचललेले हे पाऊल निश्चितच ऐतिहासिक, प्रेरणादायी आणि भविष्यवेधी आहे. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना नवी उंची देणाऱ्या या निर्णयांमुळे विज्ञाननिष्ठ, संशोधनाभिमुख आणि विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीस निश्चितच मोठे बळ मिळणार आहे.

"आजची विज्ञाननिष्ठ पिढीच उद्याचा विकसित भारत घडविणार आहे." या विचाराला मूर्त स्वरूप देत महाराष्ट्र शासनाने राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड, संशोधनाची जिज्ञासा, नवोपक्रमशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी घेतलेले निर्णय अत्यंत स्तुत्य, प्रेरणादायी आणि भविष्यवेधी आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान हे २१ व्या शतकातील प्रगतीचे प्रमुख आधारस्तंभ बनले असताना विद्यार्थ्यांना विज्ञानाशी जोडणे, त्यांच्या प्रतिभेला योग्य दिशा देणे आणि जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज होती. महाराष्ट्र शासनाने ही गरज ओळखून राज्यातील बालवैज्ञानिकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना जाहीर केल्या आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांना अनुसरून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, समस्या सोडविण्याची क्षमता आणि संशोधनवृत्ती विकसित करण्यासाठी शासनाने राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील पारितोषिकांमध्ये मोठी वाढ केली आहे. याशिवाय "मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी" या अभिनव उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञान केंद्रे, इस्रो आणि नासा यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांना भेट देण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. या निर्णयांमुळे बाल वैज्ञानिक प्रदर्शनी हा केवळ स्पर्धेचा मंच न राहता विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देणारा प्रेरणादायी प्रवास ठरणार आहे.

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या प्रमुख योजना

"मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी" योजनेचे स्वरूप

स्तर	लाभार्थी	संधी / उपक्रम	लाभार्थी संख्या
तालुकास्तर	प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी	जवळील विज्ञान केंद्राला भेट (रमन सायन्स सेंटर नागपूर, पिंपरी-चिंचवड सायन्स सेंटर पुणे किंवा नेहरू तारांगण मुंबई)	२,१४८ विद्यार्थी
जिल्हास्तर	उत्कृष्ट निवड झालेले विद्यार्थी	इस्रो (ISRO), बेंगळुरू येथे शैक्षणिक भेट	१८० विद्यार्थी
राज्यस्तर	उत्कृष्ट बालवैज्ञानिक विद्यार्थी	नासा (NASA), अमेरिका येथे शैक्षणिक भेट	५१ विद्यार्थी

राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील वाढीव पारितोषिके

पारितोषिक	नवीन रक्कम (रु.)
प्रथम क्रमांक	₹ ५१,०००
द्वितीय क्रमांक	₹ ३१,०००
तृतीय क्रमांक	₹ २१,०००
चतुर्थ क्रमांक	₹ ११,०००
उत्तेजनार्थ - १	₹ १०,०००
उत्तेजनार्थ - २	₹ १०,०००
उत्तेजनार्थ - ३	₹ १०,०००

ही पारितोषिके प्राथमिक, माध्यमिक, शिक्षक, आदिवासी आणि दिव्यांग गटांना तसेच शिक्षक आणि प्रयोगशाळा गटांनाही लागू करण्यात आली आहेत.

याद्वारे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणाऱ्या विशेष संधी

योजना	उद्देश	अपेक्षित परिणाम
विज्ञान केंद्र भेट	विज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे	विज्ञानाविषयी कुतूहल वाढणे
इस्रो भेट	भारतीय अंतराळ संशोधनाची ओळख	अंतराळ विज्ञानाविषयी प्रेरणा
नासा भेट	जागतिक दर्जाच्या विज्ञान संस्थांचा अनुभव	जागतिक पातळीवर विचार करण्याची क्षमता
वाढीव पारितोषिके	विद्यार्थ्यांना प्रोत्साहन	विज्ञान प्रदर्शनातील सहभाग वाढणे
आदिवासी व दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश	सर्वसमावेशक विज्ञान शिक्षण	समान संधी उपलब्ध होणे

महाराष्ट्र शासनाने घेतलेले हे निर्णय केवळ आर्थिक सहाय्य किंवा शैक्षणिक सहलींचे नियोजन नाही. या योजनांमागे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये विज्ञानाविषयी आकर्षण निर्माण करण्याचा, त्यांना संशोधन आणि नवोपक्रमाच्या दिशेने प्रेरित करण्याचा आणि भविष्यातील वैज्ञानिक, अभियंते, संशोधक व तंत्रज्ञ घडविण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे. आज ग्रामीण भागातील एखादा विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतो आणि उद्या त्याला इस्रो किंवा नासा पाहण्याची संधी मिळते, ही बाबच विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवे आकाश देणारी आहे.

विशेषतः आदिवासी, दिव्यांग आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यामुळे विज्ञान क्षेत्रातील संधी आता केवळ महानगरांपुरत्या मर्यादित न राहता राज्याच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहेत.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी विज्ञान शिक्षणाला नवी दिशा देणारे हे ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस , मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे, मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार, शालेय शिक्षणमंत्री मा. दादाजी भुसे साहेब तसेच शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. पंकजजी भोयर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करावेच लागेल.

त्यांच्या नेतृत्वाखाली विज्ञान, संशोधन आणि नवोपक्रमाला मिळालेले हे प्रोत्साहन भविष्यात महाराष्ट्राला देशातील विज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य राज्य बनविण्यास निश्चितच मदत करेल. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना उंच भरारी देणाऱ्या आणि विज्ञाननिष्ठ महाराष्ट्राच्या निर्मितीस बळ देणाऱ्या या योजना राज्याच्या शैक्षणिक इतिहासात मैलाचा दगड ठरणार आहेत.

"आजचा बालवैज्ञानिकच उद्याचा जागतिक संशोधक असतो; आणि त्या संशोधकाच्या स्वप्नांना पंख देण्याचे कार्य महाराष्ट्र शासनाने या ऐतिहासिक योजनांद्वारे केले आहे."

महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रगतीच्या इतिहासात "**मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी**" आणि **राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील वाढीव पारितोषिक** योजना या निश्चितच मैलाचा दगड ठरणाऱ्या योजना आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांना विज्ञान, संशोधन आणि नवोपक्रमाच्या जागतिक विश्वाशी जोडण्याचे कार्य या योजनांमुळे शक्य होणार आहे. विज्ञान केंद्रे, इस्रो आणि नासा यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांच्या भेटींद्वारे विद्यार्थ्यांच्या मनात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजेल, त्यांच्या स्वप्नांना नवे क्षितिज लाभेल आणि भविष्यातील संशोधक, वैज्ञानिक व तंत्रज्ञानतज्ज्ञ घडविण्याचा मजबूत पाया निर्माण होईल.

विशेषतः ग्रामीण, आदिवासी आणि दिव्यांग विद्यार्थ्यांनाही समान संधी उपलब्ध करून देत महाराष्ट्र शासनाने विज्ञान शिक्षणातील समावेशकतेचा आदर्श निर्माण केला आहे. विज्ञान प्रदर्शनातील वाढीव पारितोषिके ही विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या परिश्रमाचा सन्मान तर आहेतच, परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे ती नव्या पिढीला विज्ञानाच्या दिशेने प्रेरित करणारी शक्ती आहेत.

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, दोन्ही मा. उपमुख्यमंत्री, मा. शालेय शिक्षणमंत्री आणि मा. राज्यमंत्री यांनी घेतलेले हे दूरदर्शी निर्णय राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देणारे ठरणार आहेत. विज्ञाननिष्ठ, संशोधनाभिमुख आणि नवोपक्रमप्रधान महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर संपूर्ण राज्याच्या प्रगतीसाठी आशादायी आहे.

आज बाल वैज्ञानिक प्रदर्शनीतील एका विद्यार्थ्याच्या हातातील छोटासा प्रयोग उद्या जग बदलणाऱ्या शोधात रूपांतरित होऊ शकतो. अशा असंख्य स्वप्नांना बळ, दिशा आणि आकाश देणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या या ऐतिहासिक उपक्रमांचे मन:पूर्वक स्वागत आणि अभिनंदन!

"विज्ञानाची कास धरणारी पिढी घडली तरच विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारताचे स्वप्न साकार होईल; आणि त्या स्वप्नपूर्तीची भक्कम पायाभरणी महाराष्ट्र शासनाने आज केली आहे."
















realme Shot by Dr Ravindra Bhaskar
2026/01/29 15:51

ओपन-सोर्स सॉफ्टवेअर वापरून डेटा विश्लेषणावरील क्षमता विकास कार्यक्रम

सविस्तर अहवाल

आयोजक: राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT), शैक्षणिक सर्वेक्षण विभाग, नवी दिल्ली

सहयोगी संस्था : राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर

स्थळ: रवी भवन कॅम्पस, सिव्हिल लाईन्स, नागपूर

कालावधी: २३ फेब्रुवारी २०२६ ते २७ फेब्रुवारी २०२६

वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:००

प्रस्तावना :

आधुनिक युगात, डेटा विश्लेषण हे शैक्षणिक संशोधन आणि शोध निबंधाचा एक अविभाज्य भाग बनले आहे. सांख्यिकीय साधने आणि ओपन-सोर्स सॉफ्टवेअरच्या वापरामुळे संशोधनाच्या निष्कर्षांची अचूकता, विश्वसनीयता आणि वैधता वाढते. हे लक्षात घेऊन, सहभागींना आवश्यक विश्लेषणात्मक आणि संशोधन कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी 'ओपन-सोर्स सॉफ्टवेअरसह डेटा विश्लेषण' या विषयावर पाच दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा उद्देश ओपन-सोर्स साधनांचा वापर करून आधुनिक डेटा विश्लेषण तंत्रांचे सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक अनुभव, दोन्ही प्रदान करणे हा होता.

कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये :

कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे होती:

- संशोधनात वापरल्या जाणाऱ्या सांख्यिकीय तंत्रांची समज विकसित करणे
- डेटा विश्लेषणासाठी ओपन-सोर्स सॉफ्टवेअरच्या वापरामध्ये सहभागींना प्रशिक्षण देणे
- डेटा व्हिज्युअलायझेशन आणि इंटरप्रिटेशनमधील कौशल्ये वाढवणे
- गृहीतक चाचणी आणि प्रगत सांख्यिकीय साधनांचे ज्ञान प्रदान करणे
- संशोधन प्रस्ताव तयार करण्यासाठी सहभागींना मार्गदर्शन करणे

सहभागींची माहिती :

सदर कार्यक्रमात देशातील विविध राज्यातील आणि महाराष्ट्रातील शिक्षण विभागातील व संस्थांमधील शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, संशोधक असे एकूण 32 प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. सहभागींनी चर्चा, प्रात्यक्षिक सत्रे आणि सादरीकरणांमध्ये सक्रियपणे सहभाग घेतला, ज्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत संवादात्मक आणि फलदायी ठरला.



दिवसनिहाय सविस्तर अहवाल

दिवस १:- २३ फेब्रुवारी २०२६

प्रशिक्षणार्थी नोंदणीने कार्यक्रमाची सुरुवात झाली, त्यानंतर उद्घाटन सत्र पार पडले. उद्घाटन कार्यक्रमाला राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे संचालक मा. डॉ. राजकुमार अवसरे आणि जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, नागपूर च्या प्राचार्या डॉ. हर्षलता बुराडे उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमाचे कार्यक्रम समन्वयक म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT), शैक्षणिक सर्वेक्षण विभाग, नवी दिल्ली येथील सहयोगी प्राध्या[पक डॉ. विशाल पाजनकर ही देखील उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. नितु सुनिल गावंडे यांनी संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमाची धुरा सांभाळली. मान्यवरांनी शैक्षणिक संशोधनात डेटा विश्लेषणाचे महत्त्व अधोरेखित केले. सदर उद्घाटन कार्यक्रमाने या प्रशिक्षणाची सुरुवात झाली.

पहिल्या सत्रात सहभागींना डेटा विश्लेषणात वापरल्या जाणाऱ्या ओपन-सोर्स सॉफ्टवेअरची ओळख करून देण्यात आली. वर्णनात्मक सांख्यिकीची संकल्पना, ज्यामध्ये मध्यमान, मध्यक आणि बहुलक यांसारख्या मापनांचा समावेश आहे, सविस्तरपणे समजावून सांगण्यात आली. सहभागींना स्तंभ आलेख, वर्तुळालेख आणि वृत्तालेख यांसारख्या आलेखवर आधारित सादरीकरण तंत्रांचेही प्रशिक्षण देण्यात आले. दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष सरावावर लक्ष केंद्रित करण्यात आले, ज्यामुळे सहभागींना त्यांनी शिकलेल्या गोष्टी व्यावहारिकरित्या लागू करता येईल.

दिवस २:- २४ फेब्रुवारी २०२६

दुसऱ्या दिवसाची सुरुवात आदल्या दिवसाच्या उपक्रमांचा आढावा आणि चर्चेने झाली. सहभागींनी त्यांचे शिकण्याचे अनुभव सांगितले आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले.





सहसंबंध आणि प्रतिगमन विश्लेषणावरील (correlation and regression analysis) सत्रामुळे सहभागींना चलांमधील संबंध समजण्यास मदत झाली. एक किंवा दोन चलांची तुलना करण्यावर लक्ष केंद्रित करून टी-टेस्ट विश्लेषण देखील समजावून सांगण्यात आले. पुढील सत्रांमध्ये डेटा प्रीप्रोसेसिंग आणि व्हिज्युअलायझेशन तंत्रांचा समावेश होता, जे प्रभावी डेटा विश्लेषणासाठी आवश्यक आहेत. प्रात्यक्षिक प्रशिक्षण सुरू राहिले, ज्यामुळे सहभागींची व्यावहारिक कौशल्ये व ज्ञान अधिक दृढ झाले.

दिवस ३:- २५ फेब्रुवारी २०२६

तिसऱ्या दिवशी परिकल्पना चाचणीवर लक्ष केंद्रित करण्यात आले. सहभागींना शून्य आणि पर्यायी परिकल्पना (null and alternative hypothesis), सार्थकता पातळी (levels of significance) आणि निर्णय प्रक्रिया (decision-making processes)यांची ओळख करून देण्यात आली. तसेच क्षेत्रभेट अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा व बापुकुटी, सेवाग्राम, वर्धा येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे सहभागींना शैक्षणिक संशोधन पद्धतींविषयी वास्तविक जगाचा अनुभव आणि व्यावहारिक अंतर्दृष्टी प्राप्त झाली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मुलोंदयोगी किंवा नई तालिम शिक्षण पद्धतीवर आधारित आनंदनिकेतन या शाळेच्या भेटीतून प्रशिक्षणार्थी यांना प्रत्यक्ष कृतीवर आधारित या अध्यापन तंत्राची संकल्पना समजून घेता आली.









दिवस ४:- २६ फेब्रुवारी २०२६

चौथ्या दिवशी संशोधन कार्यात आयसीटी (ICT) साधनांच्या वापरावर भर देण्यात आला. तंत्रज्ञान संशोधनाची कार्यक्षमता कशी वाढवू शकते हे सहभागींनी शिकुन घेतले. ANOVA (एक-मार्गी आणि द्वि-मार्गी) वरील सत्रांमुळे विचलन विश्लेषणाची (Variance analysis) सखोल माहिती मिळाली. काय-स्क्वेअर चाचण्या (Chi-square tests) आणि नॉन-पॅरामीट्रिक चाचण्यांवर (non-parametric tests) देखील सविस्तर चर्चा करण्यात आली. या दिवसाचा समारोप प्रात्यक्षिक सत्रांनी झाला, ज्यात सहभागींनी शिकलेल्या तंत्रांचा वापर करून डेटासेटचे विश्लेषण केले.

दिवस ५:- २७ फेब्रुवारी २०२६

शेवटच्या दिवशी विद्यार्थी मूल्यांकनामध्ये ओपन-सोर्स सॉफ्टवेअरच्या वापरावर लक्ष केंद्रित करण्यात आले. सहभागींनी ERIC प्रस्ताव कसे विकसित करावे आणि प्राधान्यक्रमाची संशोधन क्षेत्रे कशी ओळखावीत हे देखील शिकले.

सहभागींच्या अध्ययनाचे मूल्यांकन करण्यासाठी एक ऑनलाइन चाचणी घेण्यात आली. सर्वात शेवटी समारोप सत्रामध्ये प्रशिक्षणार्थी यांना प्रमाणपत्र वितरण आणि कार्यक्रमाची सांगता झाली.









सदर क्षमता बांधणी कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. या कार्यक्रमाने सहभागींना डेटा विश्लेषण क्षेत्रात मौल्यवान ज्ञान आणि व्यावहारिक अनुभव प्रदान केला. असे उपक्रम संशोधन क्षमता बळकट करण्यात आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

पश्चिम भारत विज्ञान जत्रा

विद्यार्थ्यांच्या विज्ञान आणि गणित विषयातील सर्जनशीलता, कल्पकता व नवनिर्मितीच्या वृत्तीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात. **विज्ञान जत्रा म्हणजे विद्यार्थ्यांच्या संशोधन कार्याचे प्रदर्शन.** विज्ञान जत्रा या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासास प्रोत्साहन मिळते स्वतः केलेल्या वैज्ञानिक प्रकल्पाचे स्पष्टीकरण आणि त्याबद्दल, सहकारी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि सामान्यांसाठी हा प्रकल्प कसा फायद्याचे आहे हे पटवून देण्याची संधी प्राप्त होते. जत्रेतील इतर सहभागी विद्यार्थी व शिक्षक यांना विद्यार्थ्यांनी अनेक आठवडे केलेले परिश्रम पाहण्याची आणि त्यांची प्रशंसा करण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट प्रकल्पांना विज्ञान जत्रा या उपक्रमामुळे न्याय मिळतो, तसेच विद्यार्थ्यांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यास प्रेरणा मिळते आणि त्यांच्या प्रकल्पांमध्ये काय चांगले कार्य करता येते आणि ते कुठे सुधारू शकतात हे समजून घेण्यास मदत होते.

महाराष्ट्र, गोवा, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आणि दादरा व नगर हवेली ह्या राज्यांसाठी भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद, कोलकाता मार्फत क्षेत्रीय विज्ञान जत्रा (पश्चिम भारत विज्ञान जत्रा), अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा, विज्ञान नाट्योत्सव यांचे समन्वयन केले जाते. याकरिता राज्य विज्ञान शिक्षण संस्था (प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर ही संस्था समन्वयक यंत्रणा (संस्था) म्हणून काम करीत असते.

पश्चिम भारत विज्ञान जत्रा या उपक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक कार्यकारणभाव रुजवून विश्लेषणात्मक विचारांची जाणीव निर्माण करणे.

२. भावी वैज्ञानिकांना विचार प्रवृत्त करून विचारांचे आदान-प्रदान करण्यासाठी अधिकृत व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

३. देशात विखुरलेल्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे.

४. विविध क्षेत्रातील विद्यार्थी व देशातील भावी शास्त्रज्ञ यांना भविष्यातील संशोधनावर एकमेकांच्या सहयोगाने व समन्वयाने चर्चा करण्यासाठी व समस्या सोडवण्यासाठी एकत्र आणणे.

५. विविध राज्यातील बाल वैज्ञानिकांनी स्वतः चे विचार, संस्कृती आणि संशोधन कार्य यांची एकमेकांसोबत देवाणघेवाण करणे व सर्वांसोबत मैत्रीचे, सहयोगाचे नाते स्थापित करणे.

पश्चिम भारत विज्ञान जत्रा या उपक्रमाची व्याप्ती आणि स्वरूप:

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद मार्फत विद्यार्थी संशोधन प्रकल्पासाठी भौतिकशास्त्र, संगणक शास्त्र, गणित, अभियांत्रिकी, पर्यावरण शास्त्र, रसायन शास्त्र, जीवरसायनशास्त्र, पृथ्वी व अवकाश विज्ञान, वनस्पती शास्त्र इत्यादी मुख्य विषयावर आधारित उपविषय दिले जातात. प्रत्येक राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशात तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावर विज्ञान जत्रेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेत राज्यातील सर्व शासनमान्य शाळेतील माध्यमिक ते उच्च माध्यमिक स्तराचे इ. ८ वी ते १२ वी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. एका प्रकल्प चमू मध्ये २ विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा: वैज्ञानिक प्रकल्प निर्मिती स्पर्धा

स्पर्धेचे स्तर:

- तालुकास्तर निवड : प्रत्येकी ०२ प्रकल्प चमू (एकूण ०४ विद्यार्थी)
- जिल्हास्तर निवड: प्रत्येकी ०३ प्रकल्प चमू (एकूण ०६ विद्यार्थी)
- विभागस्तर निवड: प्रत्येकी ०६ प्रकल्प चमू (एकूण १२ विद्यार्थी)
- राज्यस्तर निवड: ०५ प्रकल्प चमू (एकूण १० विद्यार्थी)

प्रत्येक विभागातून ०६ प्रकल्प (एकूण १२ विद्यार्थी) चमूची निवड विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावर करण्यात येते. विभागीय पातळीवरील ८ (आठ) विभागातून निवडलेली प्रत्येकी ०६ प्रकल्प (एकूण १२ विद्यार्थी) चमू याप्रमाणे एकूण ४८ (अठ्ठेचाळीस) प्रकल्प चमू राज्यस्तरीय पश्चिम भारत विज्ञान जत्रेमध्ये सहभागी होतात. राज्यस्तरीय स्पर्धेतून ०५ प्रकल्प (एकूण १० विद्यार्थी) चमूची निवड करून झोनल स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाठविण्यात येते.

शिक्षकांसाठी स्पर्धा: शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धा

स्पर्धेचे स्तर: विभागस्तर निवड: प्रत्येकी ०३ शिक्षक

राज्यस्तर निवड: ०३ शिक्षक

प्रत्येक विभागातून ०३ शिक्षकांची निवड शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावर करण्यात येते. विभागीय पातळीवरील ८ (आठ) विभागातून निवडलेले प्रत्येकी ०३ शिक्षक याप्रमाणे एकूण २४ (चोवीस) शिक्षक राज्यस्तरीय पश्चिम भारत विज्ञान जत्रेमध्ये सहभागी होतात. राज्यस्तरीय स्पर्धेतून ०३ शिक्षक निवड करून झोनल स्पर्धेत सहभागी होण्यासाठी

पाठविण्यात येते. राज्यस्तरीय पश्चिम भारत विज्ञान जत्रा स्पर्धेचे आयोजन राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रवी नगर, नागपूर द्वारे करण्यात येते.

सत्र २०२५-२६ मध्ये सदर उपक्रमाबाबत नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्याकडून राज्यस्तरीय स्पर्धेचा कालावधी हा दि. १०/१२/२०२५ ते १३/१२/२०२५ पर्यंत असल्याचे पत्र दि.१६/१०/२०२५ रोजी प्राप्त झाल्यामुळे सदर उपक्रम राबविण्याकरिता पुरेसा अवधी न मिळाल्याने सदर स्पर्धेचे आयोजन करता आले नाही. त्यामुळे सदर उपक्रमात सहभागी होण्याकरिता दरवर्षी प्रमाणे ५२ वे राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनी मधील उत्कृष्ट पाच विद्यार्थ्यांचे प्रकल्प व उत्कृष्ट तीन शिक्षकांचे प्रकल्प ३४ व्या पश्चिम भारत विज्ञान जत्रा स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता निवड करण्यात आली.

Participant Student List for 34th Western India Science Fair (WISF): 2025-26

SN	Student's Name	School Name and Address	Name of Exhibit	Guide Teacher
1	SUNESHINI VINOD BHONGALE	Z.P.U.P.S. PANCHALA, TA RAJURA, DIST. CHANDRAPUR	ECO-FRIENDLY BIO DEGRADABLE POTS	MOHINI DSHMUKH
2	JOSEPH PHILIP NAIK	ANUDANIT MB TA. NAVAPUR, DIST NANDURBAR ASHRAMSHALA, SONKHAMB, NAVAPUR, DIST: NANDURBAR	FARMER'S SAFETY FIELD	KUMAR YOGESH ROHIDAS KHARDE
3	SANSKAR SANTOSH DESHMKH	GANDHI VIDYALAYA HIGH SCHOOL, PARBHANI	SIGN LANGUAGE TRANSLATOR	MILIND MAROTRAO BAGATE
4	WAKCHOURE PUSHPA RAGHUNATH	NEW ENGLISH SCHOOL, KAWADDARA, DIST: NASHIK	INDIAN CUM WESTERN TOILET	PARDESHI PRAMOD EKAT
5	PUNAM MANGESH KAWAR	SHASKIY ASHRAM SHALA, CHANKAPUR, DIST: NASHIK	SWING OPERATOR WATER SYSTEM	SONWANE MINAKSHI

Participant Teacher List for 34th Western India Science Fair (WISF): 2025-26

SN	Teacher's Name	School Name and Address	Name of Exhibit
1	GAYATRI GURU DHURI	JILHA PARISHAD PURN PRATHAMIK SHALA BAMBULI, TALUKA: KUDAL, DIST. SINDHUDURG	MATHS MAGIC BOX
2	SWATI SUNIL BADGUJAR	Z.P.PRI.SCHOOL, PIMPRALA. TALUKA: MUKTAINAGAR, DIST. JALGAON	SANGANAKIY VICHAR
3	SANTOSH 3 KALYANRAO DESHMANE	RAJGAD VIDYALAY, WAJEGHAR, DIST. PUNE	GANITIY MODELLING ANI SANGANAKIY VICHAR










VIDNYAN BHARATI VIDARBHA PRADESH MANDAL
DHARAMPETH M. P. DEO MEMORIAL SCIENCE COLLEGE
INDIA
विज्ञान उत्सव
Utsav Date : Friday, 9th & Saturday, 10th Jan 2026
Time : 10.00 am to 5.00 pm
Venue : Dharampeth M. P. Deo Memorial Science College
Near Ambazari Lake, North Ambazari Road, Nagpur - 440033
In Association with




५३ वी राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६


५३ वी राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६






राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६


५३ वी राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनी २०२५-२६




छत्रपती संभाजीनगर
सुपुत्राचा सन्मान






प्रौद्य


प्रौद्य







HAPPY DAYS





REMEMBER 24 2020

राज्य विज्ञान शिक्षण संस्था,रविनगर, नागपूर -०१







विज्ञानाची ओढ... संशोधनाची वाट...
नवोपक्रमातून घडवूया उज्ज्वल भविष्यातील मार्गिती.